




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६७ ■ सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# अशोक खरातचा सीडीआर कुठून आला ?

## अंजली दमानियांनी ऑन कॅमेरा दाखवलं, ऑडिओ क्लिपही ऐकवली



प्रतिनिधी ६ एप्रिल

**मुंबई :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या अटकेनंतर दररोज नवनवे आणि धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणात एक खळबळजनक दावा केला होता. दमानिया यांनी थेट अशोक खरातच्या मोबाईलचा CDR, म्हणजेच कॉल डेटा रेकॉर्ड समोर आणला असल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खरातला तब्बल १७ वेळा फोन केल्याची नोंद या CDR मध्ये आढळून आली. अंजली दमानिया यांच्या दाव्यानंतर त्यांच्याकडे नेमका सीडीआर आला तरी कुठून? असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. आता अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत याबाबत खुलासा केलाय. अशोक खरातचा सीडीआर कुठून आला याबाबत अंजली दमानियांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी अंजली दमानिया यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले.

अंजली दमानिया म्हणाल्या की, सीडीआर आला कुठून वगैरे हे मी ऐकत आले. ३१ तारखेपासून कालपर्यंत मी मुंबईत नव्हते. चंडीगडमध्ये कोणताही मराठी मीडिया नव्हता. मला माझी प्रतिक्रिया तिथे देता येईना. राऊत बोलतात मी रॉ एजंट आहे का? अंधारे यांचा तर विषयच दमानिया असतो. मला सुरुवातीपासून सगळं सांगायचं आहे. १ एप्रिलला दुपारी १ वाजता मला एक फोन आला, खरातची माहिती माझ्याकडे आहे, खरातचा सीडीआर माझ्याकडे आहे, असं त्याने सांगितलं . मला सांगितलं की, तो प्रायव्हेट डिटेक्टिव्ह आहे. त्याने मला सगळं पाठवलं. रात्री मला वेळ मिळाला, तेव्हा मी सगळं बघितलं. मला त्यात कंपनीचे नाव वगैरे सगळं आलं. एक्सेल शिट खरी आहे का ? हे तपासायला मी क्लॉडवर टाकलं, असे त्यांनी म्हटले. यानंतर अंजली दमानिया यांनी ऑडीओ रन केला. यावेळी त्या म्हणाल्या की, मी हे सदानंद दाते यांना हे पाठवलं आहे. मुद्दाम हे माझ्यापर्यंत पोहोचवून दाखवले आहे का? ॲक्टिव्हिस्टला कधी कधी वापरलं देखील जातं. आता या माहितीचे असिसमेंट कसं दाखवलं जातं? कॉल हिस्ट्री घातल्याने मी सीडीआर घातला, तेव्हा सविस्तर माहिती आली.

### मिलिंद नार्वेकर यांचे ८ कॉल आले

देवेंद्र फडणवीस, चित्रा वाघ, गिरीश महाजन, सुषमा अंधारे, विखे पाटील, मोहित कंबोज, प्रसाद लाड इत्यादी लोकांचे खरात बरोबर कॉल नव्हते. मिलिंद नार्वेकर यांचे ८ कॉल आले, काय बोलता अंधारे बाई लढायचे कोणासोबत अंधारे बाई तुम्ही राजकारण करतायत. यात समरी येते, इन्कमिंग, आऊटगोईंग, सर्वात मोठे कॉल अशी माहिती येते. संजय शिरसाट, मिलिंद नार्वेकर यांचे कॉल रेकॉर्ड त्यांच्या बरोबर मिळाले. प्रभाकर काळे एकनाथ शिंदे यांचे पीए आहेत. कॉल काळेंनी केले की शिंदेंनी केले? याबाबत मला घेणं देणं नाही. मात्र, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली.

### समता पतसंस्थेची चौकशी सुरु

समता नावाची एक पतसंस्था आहे. अशोक खरातला पैसे डिपॉझिट झाल्याचे मॅसेज यायचे. फेब्रुवारी २०२५ पर्यंत अत्यंत कमी मॅसेजेस यायचे. अजित पवार यांचा अपघात व्हायच्या एक दिवस आधी १७ मॅसेज होते. २७ जानेवारीला १७ मॅसेजेस, २९ जानेवारी १० मॅसेज, ३१ जानेवारी १२ मॅसेजेस आलेले आहेत. खरातच्या खात्यात पैसे डिपॉझिट झालेत की काढले गेलेत, हे त्यांना शोधायचे आहेत. यंत्रणेची हिंमत आहे का? शिंदेंचे इतके कॉल बाहेर काढायची. शिंदेंना विचारायची गरज नाही का? का इतके कॉल केलेत. माझे डोळे झिजले पण मी ते शोधले, असे म्हणत अंजली दमानिया यांना पत्रकार परिषदेत अश्रू अनावर झाले. समता पतसंस्थेचे जे जानेवारी महिन्यात एसएमएस आले आहेत, त्याची चौकशी झाली पाहिजे. अनेक महिने असे मॅसेज नव्हते. काय देवाणघेवाण झाली? काय व्यवहार झालेत? याची चौकशी झाली पाहिजे. समतेची काय उलाढाल झाली? हेच निदर्शनास आणून द्यायचं होतं. मुख्यमंत्र्यांना सांगून काही उपयोग नाही. कारण ते राजकारणच करु इच्छितात. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पार्थ पवार यांचा रिपोर्ट दिला. मला आता फक्त सदानंद दाते यांच्याकडून आशा आहे. मी त्यांना माहिती देणार आहे, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा जागीच मृत्यू!

**चंद्रपूर :** नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील शेतालगत एका नाल्याजवळ वाघाच्या हल्ल्यात एका ५८ वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी नागभीड वनपरिक्षेत्रातील मिंडाळा नियतक्षेत्रालगत उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, मागील सव्वातीन महिन्यांत मानव-वन्यजीव संघर्षात १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मिंथूर येथील रहिवासी हरिदास महादेव कुबडे हे शनिवारी सकाळी मोहफुले वेचण्यासाठी आपल्या शेताकडे गेले होते. सायंकाळ होऊनही ते घरी परतले नाही.

# एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा स्वेच्छा निवृत्तीकडे कल

## सत्ताधाऱ्यांच्या जाचामुळे स्वेच्छा निवृत्तीची मागणी

## पडिकच्या ठरावावर वरिष्ठांनी का टाळली सही?

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या वर्तुळातून एक मोठी बातमी समोर येत आहे. महापालिकेतील एक वजनदार आणि वरिष्ठ अधिकारी आता स्वेच्छा निवृत्ती घेण्याच्या तयारीत असल्याची विश्वसनीय माहिती आहे. सत्तारुढ पक्षाच्या जाचामुळे तर हा स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज केला गेला नाही ना अशी चर्चा रंगली आहे.

प्रशासकीय कामाचा वाढता ताण किंवा सत्ताधाऱ्यांशी असलेले मतभेद, यापैकी नेमक्या कोणत्या कारणामुळे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने थेट स्वेच्छा निवृत्तीचा निर्णय घेतला जात आहे, याबाबत सध्या तर्कवितर्क लढवले जात आहेत. या बड्या अधिकाऱ्याने पद सोडल्यास महापालिकेतील सत्ताधारी पक्षासमोर मोठे संकट उभे राहू शकते. महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी सांभाळणारा अनुभवी अधिकारी अचानक गेल्यास, कामाचा गाडा हाकण्यासाठी सत्ताधाऱ्यांना तातडीने नवे आणि कार्यक्षम अधिकारी शोधावे लागतील. ऐन विकासकामांच्या काळात प्रशासकीय पोकळी निर्माण होणे सत्ताधाऱ्यांसाठी चिंतेची बाब ठरणार आहे. पडीक ठरावावर संबंधित अधिकाऱ्याने सही न करता ती पेंडिंग ठेवल्याने सत्ता पक्षात तीव्र नाराजी वाढत आहे. तर दूसरीकडे या अधिकाऱ्याने स्वेच्छा निवृत्तीचा राज्य सरकारकडे अर्ज करत सत्ता पक्षाला कोडींत पकडले आहे. येणाऱ्या काही दिवसांत यावर शिक्कामोर्तब झाल्यास अकोला महापालिकेच्या राजकारणात आणि प्रशासनात मोठे फेरबदल पाहायला मिळू शकतात.

# राज्यात 1252 शाळा, 827 तुकड्या कायमस्वरूपी अपात्र!

## मान्यता रद्द होणार, शिक्षकांचे भविष्य अधांतरी

प्रतिनिधी ६ एप्रिल

**पुणे :** कायम विनाअनुदानित तत्त्वावर सन २००० मध्ये मान्यता दिलेल्या मात्र मूल्यांकनात वारंवार अपात्र ठरलेल्या राज्यातील १२५२ शाळा अन् ८२७ तुकड्या शासनाने कायमस्वरूपी अपात्र केल्या असून त्यांची मान्यता रद्द केली जाणार आहे. याबाबतचा शासन निर्णय झाल्याने शिक्षकांचे भविष्य अधांतरी झाले आहे.

राज्यातील जवळपास ६ हजारांवर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना २००० या वर्षात कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता देण्यात आली होती. तथापि, ज्या शाळांचा कायम शब्द वगळला, अशा शाळांचे मूल्यांकन होऊन अनेक शाळा आज टप्पा अनुदान घेत आहेत. मात्र, वारंवार संधी देऊनही ज्या शाळा अपात्र झाल्या आहेत, त्यांना शासनाने कायमस्वरूपी अपात्र ठरवले असून या शाळांनी एक महिन्याच्या आत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता घ्यावी किंवा मग ती शाळा कायमस्वरूपी बंद करण्यात येईल, असे शासनाने म्हटले आहे.

### स्वयं अर्थसहाय्यितसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत

पात्रता पूर्ण न करणाऱ्या शाळांबाबत शासनाने १ एप्रिल २०२६ रोजी एक कारवाई निश्चित केली आहे. एखादी शाळा सलग ३ वर्षे मूल्यांकनात अपात्र ठरल्यास त्या शाळेची मान्यता किंवा परवानगी रद्द होईल. या शाळांना स्वयं अर्थसहाय्यित अधिनियमातील तरतुदीनुसार शासन मान्यतेसाठी अर्ज करण्यास ३० एप्रिल २०२६ ही आता अखेरची मुदत देण्यात आली आहे.

# आज नवनिर्वाचित राज्यसभा सदस्यांचा शपथविधी सोहळा!

## शरद पवारांसह इतर सदस्य खासदारकीची शपथ घेणार

वृत्तसंस्था ६ एप्रिल



**नवी दिल्ली :** दिल्लीतील संसदेत आज नवनिर्वाचित राज्यसभा सदस्यांचा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर विविध राज्यांतील दिग्गज नेते आज शपथ घेणार असून महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचा त्यात समावेश आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, रामराव वडकुते, माया ईवनाते आणि ज्योती वाघमारे आज शपथ घेणार आहेत.

राज्यसभेचे सभापती आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन या नव्या सदस्यांना शपथ देणार आहेत. दरम्यान, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे अधिकृतपणे राज्यसभा सदस्य म्हणून संसदेत पाऊल ठेवतील. विनोद तावडे १० एप्रिलला शपथ घेण्याची शक्यता आहे आहे. तर पार्थ पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यसभेवर पहिल्यांदाच निवड झाली आहे. पार्थ पवार ९ एप्रिलला शपथ घेतील.

### महाराष्ट्रातील ७ नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य

| | |
|---|---|
| विनोद तावडे | - भाजप (महायुती) |
| रामदास आठवले | - भाजप (महायुती) |
| माया ईवनाते | - भाजप (महायुती) |
| रामराव वडकुते | - भाजप (महायुती) |
| ज्योती वाघमारे | - शिवसेना शिंदे गट |
| पार्थ पवार | - राष्ट्रवादी अजित पवार गट |
| शरद पवार - | - राष्ट्रवादी श.प.गट (महाविकास आघाडी) |

# आता गोदामातून सिलेंडर विक्री बंद!

**नवी दिल्ली :** एलपीजी सिलेंडर वितरण सुरळीत सुरू रहावे यासाठी दिल्ली सरकारने गोदामांमधून होणारी सिलेंडर विक्री बंद केली आहे. दिल्ली मुख्यमंत्री कार्यालयाकडून याबद्दलची माहिती देण्यात आली. सर्व सिलेंडर वितरकांना आदेश देण्यात आले आहेत की, अशा प्रकारे सिलेंडर विक्री बेकायदेशीर असेल आणि असे आढळून आले तर कारवाई केली जाईल.

दिल्लीच्या मुख्यमंत्री कार्यालयाकडून या निर्णयाबद्दल सांगण्यात आले की, एलजीपीची वितरण व्यवस्था पारदर्शक आणि सुरळीत राहावी यासाठी गोडाऊनमधून होणारी सिलेंडरची विक्री बंद केली आहे. त्यामुळे यापुढे गोदामांमधून सिलेंडर मिळणार नाही. नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून ५ किलो वजनाच्या सिलेंडरची संख्या वाढवण्यात आली आहे. आता ओळखपत्र दाखवून हे छोटे सिलेंडर सहजपणे नागरिक घेऊ शकणार आहेत. त्यासाठी कोणत्याही पडताळणीची गरज पडणार नाही.

# स्वच्छतेवरचा 40 लाखांच्या खर्चाचा स्मार्ट फोलपणा उघड

## मशीन क्लिनिंगचा पत्ता नाही कुठे गेल्या मशिन

## स्वच्छता कंत्राटदाराची केवळ बिलांसाठी धावपळ

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला:** स्थानिक सर्वोपचार रुग्णालयातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर झाला असून, प्रशासकीय निष्काळजीपणा आणि कंत्राटी कंपनीच्या कामातील त्रुटींमुळे रुग्ण आणि नागरिक त्रस्त आहेत. रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी दरमहा ४० लाख रुपये खर्च केले जात असतानाही प्रत्यक्षात मात्र घाणीचे साम्राज्य आणि दुर्गंधी कायम असल्याचे वास्तव समोर आले आहे.

केवळ एक मशिन सुरु असून दोन मशिन बंद असल्याची माहिती आहे. सर्वोपचार रुग्णालयातील स्वच्छतेची पाहणी जिल्हाधिकाऱ्यांनी नियमित करण्याची गरज आहे. त्याशिवाय रुग्णांना दिलासा मिळणार नाही.

करारात स्वच्छतेसाठी मशीनचा वापर करणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात कर्मचारी



हातानेच नावापुरती स्वच्छता करत असल्याचे दिसून येत आहे. स्वच्छतेसाठी खरेदी केलेल्या तीन मशिनपैकी दोन गायब आहेत, तर एक बंद अवस्थेत आहे.

रुग्णालयातील औषध वितरण खिडकीजवळ आणि वरच्या मजल्यावरील स्वच्छतागृहांमध्ये प्रचंड अस्वच्छता आहे. पाण्याची टंचाई आणि दुर्गंधीमुळे नागरिकांना मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रारी करूनही, वैद्यकीय शिक्षण संशोधन मंत्रालयाला सादर केलेल्या अहवालात अधिष्ठात्यांनी कंपनीला 'क्लीन चिट' दिली असल्याचा आरोप होत आहे. लाखो रुपयांची बिले काढून शासनाच्या निधीची उधळपट्टी सुरू असल्याची चर्चा आहे. रुग्णालय आणि वॉर्ड परिसरात कचरा टाकण्यासाठी पुरेशी डस्टबिन नसल्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उघड्यावर कचरा फेकत आहेत. यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढून रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. दरमहा ४० लाख रुपये खर्च होत असतील, तर रुग्णालयात पाऊल ठेवताच नाकाला रुमाल का लावावा लागतो? हा पैसा नेमका कोणाच्या खिशात जातोय?' असा संतप्त सवाल अकोलेकर विचारत आहेत.

# माजी सैनिकाच्या पत्नीला सावकारांचा जाच

## त्या सावकारांवर होईल काय कारवाई

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला:** एकीकडे देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी सैनिक अहोरात्र कष्ट उपसत असताना, दुसरीकडे त्यांच्याच कुटुंबियांना अकोल्यात अवैध सावकारीच्या जाचाला सामोरे जावे लागत असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका माजी सैनिकाच्या पत्नीला सावकारांकडून मानसिक त्रास दिला जात असून, याप्रकरणी आता जिल्हा प्रशासन आणि पोलीस काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सैनिकाने पैशाची गरज होती म्हणून खाजगी सावकाराकडून पैसे घेतले. व्याजाचा दर अवाच्या सव्वा असल्याने मुद्दल फेडून देखील सावकारांचा जांच संपला नाही. सावकारांच्या जाचामुळे माजी सैनिकाने अकोला सोडले. पण, या माजी सैनिकांची पत्नी अकोल्यात राहत आहे. तिने कर्ज घेतले नाही. तरी देखील या माजी सैनिकाच्या पत्नीने सावकारांचे मुद्दल व व्याज दिले. सावकारांची पैशाची लालचा संपली नाही. सावकार आता नाहक माजी सैनिकाच्या पत्नीला छळत असून या प्रकरणात जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सहकारी संस्थाचे उपनिबंधक, जिल्हा महिला कल्याण विभाग आणि खदान पोलिस स्टेशन या सर्व प्रकरणात सावकारांवर कारवाई करेल काय अशी विचारणा आता सुरु झाली आहे. या गंभीर प्रकरणामुळे अकोल्यातील अवैध सावकारीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सैनिकाच्या पत्नीला होणारा त्रास थांबवण्यासाठी आता विविध विभागांनी सक्रिय होण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी या प्रकरणात स्वतः लक्ष घालून एका सैनिकाच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे.

# अल्पवयीन गुन्हेगारांचे आई वडील अडचणीत येणार

## अकोला पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचा गंभीर इशारा

## पालकांनाही दिली समज



प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** शहरातील गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी गुन्हेगारांसह त्यांच्या पालकांनाही कडक इशारा दिला आहे. कौलखेड येथे झालेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेचा तपास करताना पोलिसांनी आठ तासांतच आरोपींना अटक केली, ज्यात तीन अल्पवयीन मुलांचा समावेश होता. या गंभीर बाबीवर चांडक यांनी सडकून टीका केली आहे आणि अल्पवयीन गुन्हेगारांना इशारा दिला. त्याच बरोबर अल्पवयीन गुन्हेगारांच्या पालकांना सजग राहण्याचा सल्ला दिला आहे. आर आर सी न्यूजला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी हा इशारा दिला.अर्चित चांडक यांनी स्पष्ट केले की, १८ वर्षांखालील मुलांची जबाबदारी त्यांच्या पालकांची असते. जर एखादा मुलगा चाकू घेऊन फिरत असेल किंवा गंभीर गुन्हे करत असेल, तर त्याच्या पालकांनाही तपासात सामील करून घेतले जाईल. त्यांना नोटीस बजावून 'तुमच्यावर कारवाई का करू नये?' अशी विचारणा केली जाणार आहे.

### अल्पवयीन आरोपींना 'प्रौढ' मानण्याची मागणी

ज्युवेनाईल जस्टिस ॲक्टमधील नवीन बदलांनुसार, जर १६ ते १८ वयोगटातील मुले खून किंवा खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे करत असतील, तर त्यांना 'प्रौढ' म्हणून गृहीत धरून खटला चालवण्याची मागणी पोलीस ज्युवेनाईल जस्टिस बोर्डाकडे करणार आहेत. अशा परिस्थितीत त्यांना कायद्याचे कोणतेही विशेष संरक्षण मिळणार नाही.

### चाकू लागला तर थेट 'अटेम्प्ट टू मर्डर'

पोलीस अधीक्षकांनी वार्निंग देत रस्त्यावर कोणाकडेही चाकू आढळल्यास किंवा त्याने कोणाला साधी जखम केली तरी थेट 'खुनाचा प्रयत्न' अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल. अशा गुन्हेगारांवर एम पी डी ए अंतर्गत कारवाई करून त्यांना एक ते दोन वर्षांसाठी कारागृहात पाठवले जाईल. 'आपल्या करिअरवर लक्ष द्या, चांगले शिक्षण घ्या आणि एक आदर्श नागरिक बना. जर गुन्हेगारीचा मार्ग निवडला, तर अकोला पोलीस तुमच्यावर अशी कठोर कारवाई करतील की तुमच्या सात पिढ्या लक्षात ठेवतील. स्वतःचे आणि कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू नका,' असे भावनिक आणि तितकेच कडक आवाहन अर्चित चांडक यांनी केले आहे.






CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
सोमवार, दि.६ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## पवित्र चार धाम यात्रा!

हिंदू धर्मात चारधाम यात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही केवळ एक यात्रा नाही, तर श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक शुद्धीचा अद्भुत प्रवास मानला जातो. उत्तराखंडच्या हिमालयाच्या कुशीत वसलेली यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ हे चार पवित्र धाम जणू भक्तांच्या श्रद्धेचं अंतिम ध्येयच आहेत. अशी मान्यता आहे की या चारही धामांचं दर्शन घेतल्यानं जीवनातील पापांचा क्षय होतो, मनाला शांतता लाभते आणि आत्म्याला नव्या आध्यात्मिक उन्नतीची दिशा मिळते. म्हणूनच दरवर्षी देशभरातून हजारो भाविक हिमालयाच्या कठीण वाटा पार करत या पवित्र यात्रेसाठी उत्तराखंडमध्ये दाखल होतात.

# मराठी शाळा, भाषा वाचवा अन् देश घडवा

भाषा मरते तेव्हा संस्कृती मरते, असे म्हटले जाते. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची, संत परंपरेची, महापुरुषांच्या त्यागाची आणि आपल्या अस्मितेची जननी आहे. मात्र, जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी भाषा आणि प्रामुख्याने मराठी शाळा मोठ्या संकटातून जात आहेत.

नुकताचं डॉ. तारा भवाळकर ज्या मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. त्यांचे मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. तसेचं मागच्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. त्यांनी मराठी भाषा आणि मराठी शाळा याविषयी विचार व्यक्त करतांना सांगितले की, प्राथमिक स्तरावर शिकणाऱ्या मुलांच्या कोवळ्या मनावर अन्य भाषांचे ओझे लादणे अयोग्य आहे.मुलांच्या नैसर्गिक विकासासाठी त्यांना मातृभाषेतूनचं शिक्षण मिळणे गरजेचे असून,अन्य भाषांची सक्ती त्यांच्यावर करु नकाष्ठ

यावर्षी सातारा येथे झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी मराठी शाळांच्या संदर्भात विचार व्यक्त केले. मी ज्या शाळेत शिकलो, त्या वर्गाचा पट केवळ पाच होता. जर आजच्यासारखे पटसंख्येचे जाचक नियम त्याकाळी असते तर माझी शाळा कधीच बंद झाली असती आणि मी इथपर्यंत पोहोचलोचं नसतो. इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी शाळांची होणारी गळती थांबविणे ही केवळ सरकारचीचं नव्हे तर समाजाचीही नैतिक जबाबदारी आहे. मराठी शाळा चालायलाचं हवी, कारण उद्याचा सुजाण नागरिक याचं मराठी शाळांमधून घडणार आहे.

चिन्मयी सुमित एक मराठी अभिनेत्री आहेत. गेल्या १५ वर्षापासून त्या सामाजीक तसेचं मराठी भाषा चळवळीत आहेत. मराठी अभ्यास केंद्रातर्फे त्या काम करत आहेत. सध्या त्या खुप चर्चेत आहेत कारण त्या त्यांच्या भाषणाची सुरुवात 'जय भीम' आणि नमस्कार म्हणून करतात. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात जसे तुम्ही त्यांच्यातल्या का? वगैरेष्ठआज डिजीटल युगात वावरतांना हा प्रश्न कितपत योग्य वाटतो? हा संशोधनाचा विषय आहे. आपल्याला सर्वांना आपल्या बुध्दीच्या आणि विचाराच्या कक्षा रुंदावणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकावी मराठी शाळा कायम राहाव्यात यासाठी त्या आंदोलने देखील करत आहेत.

मराठीतील प्रतिभावान अभिनेता आणि दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटाद्वारे बंद होत असलेल्या मराठी शाळा या विषयावर प्रकाश टाकला आहे. त्या अनुषंगाने या विषयाला आणखी बळ मिळाले त्यानिमित्ताने हा लेखष्ठमराठी शाळा आणी मराठी भाषा हा विषय चं सध्या ज्वलंत विषय आहे. बर्नींग इश्यु ज्याला म्हणतात.आपल्या इथे फार चांगले आहे. लोक फार लवकर विसरतात परंतु सिनेमा द्वारे जेव्हा विषय मांडल्या जातो तेव्हा त्याचा जाताच प्रभाव जनतेवर पडतो हे एक प्रकारे चांगलं चं आहे.

जागतिकीकरणानंतर इंग्रजीच्या वाढत्या प्रभावाने मराठी माध्यमांच्या शाळांना ओहोटी लागली आहे. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतले की, मुलांचे करिअर चांगले घडते, त्यांना लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतात अशी अंधश्रद्धा समाजात सर्वदूर पसरली आहे. आपण लक्षात घेतले पाहीजे की, इंग्रजी ही भाषा आहे ज्ञान नव्हे ती शिकणे म्हणजे कौशल्य हस्तगत करणे होय. त्यामुळे गरीबातले गरीब पालक पोटाला चिमटा काढून इंग्रजी शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेतात. त्यामुळे अनेक राजकारणातल्या शिक्षणसम्राटांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा बाजार सुरू केला. पदवी स्तरावर देखील आज विद्यार्थी मराठी माध्यमाला कमी लेखतात आणी इंग्रजी च्या मागे लागतात. इंग्रजी चा 'ई' देखील कळत नसलेला विद्यार्थी इंग्रजी माध्यम घेतो आणी पोपटपंची करुन विद्यापीठाचे पेपर सोडवतो. याठिकाणी फक्त त्याला गुण मिळतात कारण आमचे पेपर तपासणारे विद्यापीठातील परीक्षक इंग्रजी माध्यम आहे. म्हणजे पोरगा हुशार आहे असं समजुन सढळ हाताने गुणदान करतात.अशी असतांना असलेली परिस्थिती आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण एक उत्तम लेखक होते. त्यांनी उच्च शिक्षण मातृभाषेतुन चं असावे यासाठी आग्रह धरला होता. परंतु आजची परिस्थिती वेगळी चं आहे.एखादी प्राथमिक शाळा बंद पडते तेव्हा एक संस्कारपीठ लुप्त होते. मराठी शाळांनी पिढ्या घडवल्या. मानवाला सुसंस्कारित केले. जीवनात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यास सक्षम तर बनवलेचं शिवाय आपल्या देशाशी, आपल्या मातीशी त्यांची घट्ट नाळ जोडली. कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीची जोपासना केली. आज मात्र मराठी माध्यमांच्या शाळांवर एकामागून एक घाला पडतो आहे आणि कोणाला त्याचे काही घेणेदेणे नाही अशी अवस्था




झालेली आहे. स्वतःला भाषाप्रेमी म्हणवणारे, मराठीचा टेंभा मिरवणारे स्वतःच्या मुलांना आणि नातवंडांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकवतात. आणि वर हेचं महाभाग 'आता ह्या शाळा बंद पडणारचं असे सांगत आपली जबाबदारी झटकतांना दिसत आहेत.

मराठी शाळांमधील शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्या सुधारण्यासाठी २००६ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'माधवराव कामत समिती' नियुक्त केली होती, तिने आपला अहवालही सरकारला सादर केला होता. त्यानंतरही शाळा बंद पडण्याचे सत्र सुरूच राहिले. गावोगावच्या मराठी शाळा शाळा बंद पडतात त्यांचे खापर केवळ इंग्रजी माध्यमाकडे मुलांना वळवणाऱ्या पालकांवर न फोडता मुळात ह्या पालकांना इंग्रजी माध्यमाकडे का जावेसे वाटते याची कारणमिमांसा देखील तपासली पाहीजे..ती पुढीलप्रमाणे १. राज्यातील प्राथमिक शिक्षणाची घसरलेली गुणवत्ता, २. साधनसुविधांचा अभाव, ३. मुलांच्या तुलनेत शिक्षकांची अल्प संख्या, ४. प्राथमिक शिक्षकांना नियमित प्रशिक्षणाचा अभाव, ५. शैक्षणिक साधनांचा अभाव ६. शिक्षकांतील गुणवत्तेचा अभाव. ७. अप्रशिक्षित मराठी प्राथमिक शिक्षकांकडून दिले जाणारे इंग्रजी शिक्षण. हे सगळे सरकारनेचं नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल आहे. ङ्कमराठी शाळा वाचवाठ ही सामाजिक मोहीम मराठी माध्यमाच्या शाळांची घटती संख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या वाचवण्यासाठी चालवली जात आहे. ज्यात इंग्रजी माध्यमाकडे वाढणारा कल, सरकारकडून अपुरे अनुदान आणि शिक्षणाचे खाजगीकरण यांसारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून मराठी शिक्षण टिकवण्यासाठी जनजागृती, आंदोलने आणि सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत पोहोचवून मराठी शाळांना पाठिंबा देण्याचे आवाहन करत आहे.

एकीकडे सीबीएसई, आयसीएसई आणि केंब्रिज बोर्डाच्या शाळांकडे मराठी विद्यार्थी पालकांचा ओढा वाढतोय.परिणामी या शाळांच्या तुलनेत मराठी शाळा मात्र या स्पर्धेत बंद पडायला लागल्याचं चित्र आहे. मराठी शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी खरंच पावले उचलली जात आहेत का? की मराठी शाळा अशाच बंद होत राहतील? असे अनेक प्रश्न आज 'आ'वासुन उभे आहेत.मराठी शाळांमध्ये पटसंख्या कमी होण्यामागचे नेमकी कारणे काय? या प्रश्नांच्या उत्तरात ढोबळमानाने खालील बाबी प्रकर्षाने आढळून येतात १.पालकांचा इंग्रजी शाळांकडे वाढता ओढा, २.इतर शाळांच्या तुलनेत मराठी शाळांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह ३.शिक्षकांना दिलेले जाणारे इतर कामे व त्यामुळे वर्गात शिकवायला मिळणारा कमी वेळ ४. मराठी शाळांसाठी येणारे प्रकल्प आणि त्याची होणारी प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अडचणीष्ठशेवटी सगळचं राजकारण्यांवर सोडून उपयोग नाही. त्यासाठी जनतेने ठोस भूमिका घेणं गरजेचे आहे.

महाराष्ट्रात आज 'मराठी भाषा' अभिजात झाली आहे. याचा अभिमान महाराष्ट्रात मिरवला जातो. पण त्याच वेळी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा एकामागोमाग एक बंद पडत चालल्या आहेत. हे समाज वास्तव आहे. 'शिक्षण बाजारू झालं आहे', 'मराठी शाळांवर चाललेला बुलडोझर थांबणार कधी?', 'मराठी भाषा अभिजात झाली; पण मराठी शाळा अभिजात कधी होणार?' हे आजच्या महाराष्ट्राच्या शैक्षणिक वास्तव आहे. प्रशासन, राज्य सरकार, पालक आणि समाज एकमेकांकडे बोट दाखवत असताना मराठी माध्यमाच्या शाळांच्या अस्तित्वावरचं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. अशी परिस्थिती आहे. 'मराठी शाळा संपणार की पुन्हा भरणार?' हा प्रश्न प्रत्येक मराठी माणसाच्या मनात घर करतो. गेल्या २ वर्षात ३० ते ४० मराठी शाळा बंद पडल्या. जवळपास ३९४ मराठी शाळांमध्ये शिकण्यासाठी विद्यार्थीच नाही. आणि ८००० शाळांमध्ये तर प्रत्येकी १० पेक्षा कमी विद्यार्थी शिकत आहेतष्ठ ङ्कमराठी भाषा अभिजात झाली, पण मग मराठी शाळांचं काय? कारखाना आणि छापखाना यात अंतर असतं आणि मराठी शाळा या कारखाना आहेतङ्ग म्हणजे चांगला सुजाण नागरिक घडविण्याचा जो राष्ट्राचा विकास करेल..मराठी भाषा टिकवण्यासाठी मराठी शाळा टिकवल्या गेल्या पाहिजेत हा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. डॉ. प्रकाशबाबा आमटे यांचे मराठी शाळा आणी मराठी भाषा यावर फार मौलिक विचार आहेत ते पुढीलप्रमाणे ते म्हणतात आम्ही आमच्या कुटुंबातील सर्वजण मराठी माध्यमातून शिकलो. आता नातवंडेदेखील मराठी माध्यमातून शिकत आहेत. आणि आम्हाला याचा अजिबात पश्चाताप नाही उलट अभिमान आहे. हे इंग्रजी आहे काय हो? इंग्रजी बोलता, लिहिता आलं पाहिजेष्ठ जगाबरोबर वावरायचं तर इंग्रजी भाषा महत्वाची आहे. पण मराठी कडे दुर्लक्ष होऊ नये.

राष्ट्रपिता महात्मा फुलेंपासून ते शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पर्यंत सर्वच समाजसुधारकांनी रक्ताचं पाणी करून उभारलेल्या शाळा आज ओस पडण्याच्या स्थितीत आहेत. त्याबद्दल सकारात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण व्यवस्थेच्या आधारे त्या सर्व शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज करणे काळाची गरज आहे. आज आपण सर्वांनी खाजगी शाळांच्या मनमानीवर अंकुश ठेवला नाही तर शिक्षण क्षेत्राचा बट्याबोळ झाल्याशिवाय राहणार नाही. हे निश्चितष्ठग्रामीण भागातील गरीब शेतकरी कष्टकरी आधीचं निसर्गाच्या तसेचं राज्यकर्त्यांच्या शोषणाच्या धोरणांमुळे आधीचं बेहाल असतांना त्याला परवडेल असं शिक्षण फक्त मराठी शाळाचं देवू शकतात हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. ग्रामीण भागातील पालकांच्या मनातील मराठी शिक्षणाबद्दलचा झालेला समज आपण सर्वांनी मिळून दूर केला पाहिजे. आपल्या मुलांना मराठी शाळेत टाका. त्यांना तिथेच शिकवावे.

भविष्यातील इंग्रजी शाळांच्या मनमानीचा धोका ओळखून उपाययोजना केल्या पाहिजे. मराठी शाळेला आधुनिकतेची जोड त्याचप्रमाणे शिक्षण पद्धतीत सुधारणा करून शाळा सर्वांगीण सक्षम करणे हा पर्यायचं मराठी शाळेला वाचवू शकतो. मराठी भाषा ही आपली 'मायबोली' आहे. तिचे संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे. मराठी शाळा समृद्ध झाल्या, तरचं मराठी भाषा टिकेल आणि वृद्धिंगत होईल. आपण सर्वांनी मिळून मराठी शाळांना बळ देऊ या आणि आपल्या भाषेचा अभिमान बाळगू या.ठमराठी पाऊल पडते पुढे... पण ते आपल्या भाषेच्या बळावरचं पडायला हवे!

प्रा. राहुल गोवर्धन माहुरे
शांतीनगर, जुनेशहर, अकोला
मोबा. ९८२२२७८९२५

# 'छत्रपती ते घटनापती' प्रबोधन वारीचा संकल्प

## जिल्ह्यातील १३५ गावांत व्याख्याने

प्रबोधन वारी समिती, अकोलाने ङ्कछत्रपती ते घटनापतीङ्ग या प्रेरणादायी विषयावर आधारित प्रबोधन वारी आयोजित करण्याचा संकल्प अकोल्यातील श्री शिवाजी महाविद्यालयात पार पडलेल्या नियोजन बैठकीत घेण्यात आला. ३ एप्रिल छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी ते १४ एप्रिल घटनापती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त या अकोला जिल्ह्यातील १३५ गावांमध्ये १३५ व्याख्यानांचे आयोजन करण्यात येणार असून, दोन्ही महामानवांच्या विचारांचा प्रसार करण्याचा व्यापक उद्देश घेऊन ही प्रबोधन वारी निघणार आहे.

या बैठकीला विविध सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मंडळी आणि प्रबोधनकार, व्याख्याते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत प्रबोधन वारीची रूपरेषा, नियोजन, विषयांचे स्वरूप, व्याख्यानांचे वेळापत्रक तसेच प्रत्येक गावातील स्थानिक समन्वयकांची जबाबदारी निश्चित



करण्यात आली. ङ्कछत्रपती ते घटनापतीङ्ग हा विषय निवडण्यामागील उद्देश स्पष्ट करताना आयोजकांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या मूल्यांची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवलेल्या भारतीय संविधानाच्या तत्त्वांची सांगड घालून समाजात जागरुकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. स्वराज्य ते सुराज्य या प्रवासातील विचारांचा सेतू निर्माण करून नागरिकांमध्ये कर्तव्यभावना आणि संविधानाबद्दल आदर निर्माण करण्याचा प्रयत्न या वारीतून केला जाणार आहे. प्रबोधन वारीदरम्यान प्रत्येक गावात अनुभवी व्याख्याते ठ छत्रपती ते घटनापती ठ या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्याने आयोजित केली जाणार आहे. या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी स्वतंत्र जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही या वारीचा प्रचार केला जाणार असून, जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत हा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या स्वराज्याच्या संकल्पनेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवलेल्या संविधानिक मूल्यांपर्यंतचा प्रवास एकत्रित करून समाजापर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अकोला जिल्ह्यातील १३५ गावांतून हा संदेश पोहोचवत आपण एक सजग, जागरूक आणि विचारशील समाज घडवण्याचा प्रयत्न करत आहोत. आपल्या गावात या प्रबोधन वारीचे आयोजन करण्यासाठी संपर्क करा.

अक्षय राऊत
प्रबोधन वारी समिती,अकोला.
७२१९५८४६०४

# वाढती गुंडागर्दी समाजासाठी घातक

**अकोला :** समाजात चांगल्या आणि वाईट प्रवृत्ती राहणारच. परंतु गुंड किंवा वाईट प्रवृत्ती ज्यावेळी उच्छाद मांडतात त्याचा त्रास समाजाला होतो. काही शस्त्रधारी शहराच्या एखाद्या भागात जाऊन युवकांवर प्राणघातक हल्ला करतात. वाहनांची तोडफोड करतात. अशा वेळी आम्ही अगतिक होऊन सहन करीत राहणार की गुंडांना त्यांची जागा दाखवणार हा प्रश्न आहे. केवळ पोलिसांवर अवलंबून चालणार नाही तर अशा प्रवृत्ती ठेचून काढण्याची मानसिकता तयार करण्याची वेळ आली आहे.

अकोला शहरात गेली काही महिने घडणाऱ्या घटना मन सुन्न करणा-या आहेत. ज्या मित्रांवर विश्वास ठेवून जगावे तेच मित्र घात करीत आहेत. अशात तर सैन्य दलातील एका जवानाला जीवन संपवावे लागले. एखाद्या वस्तीमध्ये मुलांचे टोळके युवकावर हल्ला करतात आणि त्याला संपवतात. वाढदिवस साजरा करण्यासाठी किंवा दारू पिण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून हत्या केली जाते. इतकेच काय तर गाडीचा धक्का लागला म्हणून जीव घेतला जात आहे. सामाजिक आणि मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून या घटनांचा विचार करण्याची वेळ आली आहे. वाढती गुंडागर्दी समाजासाठी घातक ठरते आहे. शनिवारी सायंकाळी काही गुंडांनी कौलखेड भागात धिंगाणा घातला. तिघांवर प्राणघातक हल्ला केला. त्यांची काय चूक होती. कळायला मार्ग नाही. पोलिस शोध घेतील. परंतु प्राप्त माहिती नुसार धुरंधर पाहून त्यांनी हे कृत्य केले असल्याची शक्यता आहे.

सिनेमा पाहून अशा प्रकारे सामाजिक स्वास्थ्य बिघडू लागले तर काही खरे नाही. वाढत चाललेली अराजकता सभ्य समाजासाठी घातक ठरते आहे. गुंडगिरी थांबावी म्हणून कडक पावले उचलावी लागतील. तसेच समाजात उच्छाद मांडणा-यांच्या मुसक्या आवळाव्याच लागतील. त्याला राजाश्रय मिळता कामा नये. कारण कायदा सर्वांसाठी समान आहे. शेवटी अपप्रवृत्तीचा प्रतिकार करावाच लागेल.



# करिअरच्या विविध संधींवर एक नजर..!

भारताचा स्पेस सायन्स प्रोग्राम आता खूप विकसित झाला आहे. त्यामुळेच देशातील तरुण शास्त्रज्ञांसाठी देशासह परदेशातील अवकाश विज्ञानाची दारे खुली झाली आहेत. आज या क्षेत्रात नोकऱ्यांची कमतरता नाही, फक्त ज्ञानाची गरज आहे. त्यामुळे स्पेस सायन्स हा तरुणांसाठी करिअरचा उत्तम पर्याय बनत चालला आहे.

प्रगत तंत्रज्ञानामुळे आज जमिनीपासून आकाशापर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे. त्यामुळे येथील तरुणांसाठी करिअरचे नवे पर्याय खुले होत आहेत. तुम्हालाही अंतराळ विश्वाच्या रहस्यात रस असेल तर तुम्ही स्पेस सॅन्सिसमध्ये करिअर करू शकता. भारताचा स्पेस सायन्स प्रोग्राम आता खूप विकसित झाला आहे. त्यामुळेच देशातील तरुण शास्त्रज्ञांसाठी देशासह परदेशातील अवकाश विज्ञानाची दारे खुली झाली आहेत. आज या क्षेत्रात नोकऱ्यांची कमतरता नाही, फक्त इच्छाशक्तीची गरज आहे.

### करिअर पर्याय

आता अवकाश विज्ञानाचा विस्तार खूप झाला आहे. या क्षेत्रात येण्यासाठी खगोलशास्त्र आणि खगोल



भौतिकशास्त्र, पृथ्वी विज्ञान, प्राइमेट ॲटमॉस्फियर आणि एरोनॉमी आणि सौर मंडळाचे अभ्यासक्रम करता येतील. अंतराळ विज्ञान अनेक उपशाखांमध्ये विभागलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने कॉस्मॉलॉजी, प्लॅनेटरी सायन्स, ॲस्ट्रॉनॉमी, स्टेलर सायन्स, ॲस्ट्रॉलॉजा इ. या सर्व विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या शाखा आहेत, ज्या अवकाश विज्ञानासाठी उपयुक्त आहेत. यापैकी कोणतीही शाखा निवडून विद्यार्थी आपले करिअर घडवू शकतात. स्पेस सायन्समध्ये अस्तित्वात असलेल्या विविध करिअरवर एक नजर टाकूया.

**१) खगोलशास्त्र**

बाह्य अवकाश संशोधन करणे हे अंतराळ विज्ञानातील खगोलशास्त्राचे कार्य आहे. यामध्ये सूर्यमाला, तारे, आकाशगंगा, ग्रह इत्यादींचा समावेश होतो. ज्यावर ते जमिनीवरून संशोधन करून येथे घडणाऱ्या विविध घटना जाणून घेतात.

**२) अंतराळवीर**

अंतराळवीरांबद्दल जवळपास सर्वांनाच माहिती आहे, हे असे लोक आहेत जे अंतराळात फिरून आपली स्वप्ने पूर्ण करतात. स्पेस स्टेशनवर राहून संशोधन करणे हे त्यांचे काम आहे. त्यांना अनेक महिने स्पेस स्टेशनमध्ये राहावे लागते.

**३) स्पेस टेक्नोलॉजी**

या क्षेत्रातील अवकाश तंत्रज्ञानाचे करिअरही खूप चांगले मानले जाते. यामध्ये सॅटेलाइट, स्पेस स्टेशन, स्पेसक्राफ्ट, स्पोर्ट्स इन्फ्रास्ट्रक्चर इक्विपमेंट डिझाइन करण्याचे काम केले जाते.

**४) स्पेस इंजिनीअरिंग**

कोणत्याही अंतराळ मोहिमेशी संबंधित सर्व उपकरणे डिझाइन करणे हे स्पेस इंजिनिअरचे मुख्य काम आहे. तो एरोस्पेस, रोबोटिक्स, मटेरियल सायन्स, कॉम्प्युटर इंजिनीअरिंग तसेच मेकॅनिकल आणि टेलिकॉम इंजिनीअरिंग अशा अनेक क्षेत्रातील इंजिनीअरिंग येथे काम करतात.

**५) स्पेस रिसर्च**

हे खूप विस्तृत क्षेत्र मानले जाते. अवकाश संशोधनात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असतो. जसे- खगोलभौतिकशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, जैवरसायनशास्त्रज्ञ आणि जैवभौतिकशास्त्रज्ञ, भूगर्भशास्त्रज्ञ आणि खगोलजीवशास्त्रज्ञ. हे सर्वजण आपापल्या वैशिष्ट्यानुसार काम करतात.

**६) स्पेस लॉ**

अंतर्गत क्षेत्राशी संबंधित गतिविधी नियंत्रित करणारा कायदा आहे. यामध्ये देश आणि कंपन्यांमधील करार, संधी, अधिवेशने आणि संघटना यांच्या नियमांची माहिती मिळते. आजच्या काळात अवकाशात ज्याप्रकारे गर्दी वाढत आहे. हे पाहता स्पेस लॉ करिअरचा चांगला पर्याय निर्माण होऊ शकतो.

**७) स्पेस टुरिझम**

हे अंतराळ क्षेत्रातील सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. आता यात अनेक नवीन खासगी कंपन्या येत आहेत. तरुणांना करिअर करण्याची उत्तम संधी येथे आहे. आजच्या काळात व्हर्जिन गॅलेक्टिक, ब्लू ओरिजिन, ओरियन, स्पेसएक्स, ओरियन स्पॅन आणि बोईंग यांसारख्या कंपन्या पर्यटन क्षेत्रात कार्यरत आहेत.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा. त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अडगांव बु. येथे जम्मा जागरणाचे आयोजन



**अडगाव बु.:** सालाबादप्रमाणे यंदाही रामदेव बाबा सेवा समिती च्या वतीने स्थानिक नवीन बालाजी मंदिरात विशाल जम्मा जागरण चे आयोजन करण्यात आले आहे. राजस्थानी लोकांचे आराध्य दैवत असलेल्या रामदेवबाबा यांच्या जिवन चरित्रावर स्थानिक रामदेवबाबा सेवा समिती, अडगाव बु. शिवाजी नगरच्या वतीने जम्मा जागरणचे आयोजन करण्यात आले आहे. जालना येथील जम्मा गायक मनीष दायमा व शुभम दायमा सुरेल आवाजाने भाविकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. या धार्मिक सोहळ्यात रामदेव बाबांची जन्म कथा, अखंड ज्योत, ब्यावले, संपूर्ण परचे आणि भजनांचा कार्यक्रम सादर केला जाईल आयोजित जम्मा जागरण सोहळा मंगळवार दिनांक ७ एप्रिल ला सायंकाळी ६ वाजल्यापासून स्थानिक नवीन बालाजी मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे ..कार्यक्रमात परीसरातील तमाम भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन रामदेव बाबा सेवा समिती, सुंदरकांड सेवा समिती, राजस्थानी महिला मंडळशिवाजी नगर यांनी केले आहे.

## शिवर येथे हनुमान जयंती उत्साहात; विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरण

**अकोला :** अकोला महानगर पालिका प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री हनुमान मंदिर संस्थान येथे हनुमान जयंती निमित्त गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

याप्रसंगी सकाळी श्री हनुमान मूर्तीचे विधिवत पूजन, अभिषेक व सामूहिक आरती करण्यात आली. यानंतर शेगाव येथील हभप कैलास महाराज गावंडे यांचे कीर्तन पार पडले. आपल्या ओजस्वी वाणीतील कीर्तनातून त्यांनी श्री हनुमंत रायाचे महत्त्व पटवून देत उपस्थित भाविकांना भक्तिरसात रंगवले. कीर्तन कार्यक्रमात हभप बळीराम महाराज दोड, हभप राजेंद्र महाराज वैराळे तसेच माऊली हरिपाठ मंडळ, शिवर यांनीही आपली सेवा अर्पण केली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नारीशक्ती सक्षमीकरणासाठी मोफत जीएसटी प्रशिक्षण कोर्स

**अकोला:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त समाजातील वंचित, दुर्बल व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील महिलांना स्वावलंबी, सक्षम व रोजगाराभिमुख बनविण्याच्या उद्देशाने मोफत जीएसटी प्रशिक्षण दिले जाणार आहे. उपक्रमाचे आयोजन नगरसेवक तथा गटनेता वंचित बहुजन आघाडी निलेश देव तसेच अॅड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. मागील वर्षी ११ गरजू महिलांना रोजगारनिर्मितीसाठी मोफत शिलाई मशीनचे वाटप केले होते. या कोर्सचा कालावधी ३ महिने असून प्रशिक्षणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कामावर आधारित मार्गदर्शन दिले जाणार आहे. कोर्स पूर्ण केल्यानंतर MKCL, पुणे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांचे संयुक्त प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, ज्यामुळे प्रशिक्षणार्थींना विविध व्यावसायिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल.

# जनगणनेच्या माध्यमातून मुख्याध्यापक आणि शिक्षकांना हवी सुटका

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला:** गेल्या काही वर्षापासून प्रलंबित असलेल्या जनगणनेच्या कामाची चर्चा आता पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. मात्र, हे 'राष्ट्रीय कर्तव्य' पार पाडताना शिक्षण क्षेत्राचे कणा असलेल्या मुख्याध्यापक आणि शिक्षकांमध्ये मोठा असंतोष पाहायला मिळत आहे. अध्यापनाचे काम सोडून जनगणनेच्या कामात जुंपले जात असल्याने, शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत असल्याची भावना शिक्षक संघटनांकडून व्यक्त केली जात आहे.

### राजकीय हस्तक्षेप आणि प्रशासनावरील दबाव

दुसरीकडे, जनगणनेच्या प्रक्रियेत राजकीय नेत्यांचा वाढता हस्तक्षेप चिंतेचा विषय ठरत आहे. स्थानिक नेत्यांकडून आपल्या मर्जीतील लोकांना सवलत मिळवून देण्यासाठी किंवा विशिष्ट भागातील सर्वेक्षणाबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात आहे. काही राजकीय नेत्यांनी तर काही शिक्षकांना वगळावे असा आग्रह धरला आहे. 'एकीकडे राष्ट्रीय कर्तव्य म्हणून आम्हाला हे काम करावे लागते, पण दुसरीकडे स्थानिक राजकारणामुळे आणि प्रशासकीय दबावामुळे काम करणे कठीण झाले आहे. अधिकाऱ्यांनाही वरून आदेश पाळावे लागतात, ज्यामुळे शेवटी शिक्षकांचीच ओढाताण होते,' असे एका मुख्याध्यापकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. जनगणनेच्या कामासाठी सुशिक्षित बेरोजगार किंवा स्वतंत्र यंत्रणेची नियुक्ती करावी. मुख्याध्यापकांना प्रशासकीय कामातून सूट देऊन केवळ पर्यवेक्षकीय जबाबदारी द्यावी. शैक्षणिक सत्राच्या मध्यात अशा प्रकारची अशैक्षणिक कामे लादली जाऊ नयेत.आगामी काळात शिक्षक संघटना या विषयावर आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत असून, शासनाने यावर काय मार्ग काढला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिक्षकांच्या मते, जनगणनेचे काम अत्यंत क्लिष्ट आणि वेळखाऊ असते. यामध्ये घराघरात जाऊन माहिती गोळा करणे, ती ऑनलाइन नोंदवणे आणि तांत्रिक त्रुटी दूर करणे यातच शिक्षकांचा बराच वेळ खर्ची पडतो. विद्यार्थ्यांच्या परीक्षा जवळ येत असताना शिक्षकांना सर्वेक्षणासाठी पाठवल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यास अडचणी येतात. अशैक्षणिक कामांच्या ओझ्यामुळे शिक्षकांना शिकवण्यावर लक्ष केंद्रित करणे कठीण झाले आहे.शाळेचे प्रशासन सांभाळताना जनगणनेच्या कामाचे नियोजन करणे मुख्याध्यापकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

## आरडीजी महाविद्यालय प्रांगणात सुंदरकांड सोहळा

**अकोला:** आरडीजी कॉलेजच्या प्रांगणात नित्य सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या हास्य क्लब, सूर्योदय ग्रुप, झुंबा ग्रुप, मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांच्या वतीने सुंदरकांड सोहळा संपन्न झाला. हनुमान जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात सामूहिक सुंदरकांड म्हणण्यात आले. मैदानात असणाऱ्या हनुमान मंदिरातील हनुमंताच्या पूजा आरतीने सुंदरकांड प्रारंभ करण्यात आला. यानंतर सर्व मंडळांच्या वतीने आयोजित महाप्रसादाचा शेकडो हनुमान भक्तांनी लाभ घेतला.

# आईची माया लावलेल्या शिक्षिकेला निरोप विद्यार्थिनींच्या अश्रूंनी दाटला शाळेचा प्रांगण

मोहम्मद इमरान ६ एप्रिल



**आलेगाव:** 'मॅडम, आम्हाला सोडून जाऊ नका' असे म्हणत विद्यार्थिनी अक्षरशः रडत होत्या, आणि समोर उभ्या असलेल्या शिक्षिकेलाही अश्रू आवरत नव्हते.

असा हृदय पिळवटून टाकणारा क्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आलेगाव (कन्या) येथे अनुभवायला मिळाला. विद्यार्थिनींना केवळ शिक्षण देणारी नव्हे, तर आईप्रमाणे माया करणारी, त्यांच्या प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या प्रतिभा रामेश्वर बंड सेवेतून निवृत्त झाल्या.

३४ वर्षे त्यांनी विद्यार्थिनींना आपल्या मुलीप्रमाणे जपले, घडवले आणि जीवनमूल्यांची शिकवण दिलीम्हणूनच त्यांच्या निरोपाच्या वेळी डोळे पाणावले.

पातुर तालुक्यातील शिक्षक समायोजन प्रक्रियेदरम्यान त्यांनी दाखवलेली मानवीय भूमिका सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. '५३+' सूट मिळण्याचा अधिकार असतानाही त्यांनी त्याचा वापर न करता स्वेच्छेने समायोजन प्रक्रियेत सहभाग घेतला. आपल्या निवृत्तीनंतर शाळा एकशिक्षकी होऊ नये, सहकारी शिक्षिकेची गैरसोय होऊ नये आणि विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान टळावे, या व्यापक दृष्टिकोनातून त्यांनी हा निर्णय घेतला. त्यांच्या या उदात्त विचारामुळे शाळा एकशिक्षकी होण्यापासून वाचली असून सहकाऱ्यांविषयीची त्यांची आत्मीयता अधोरेखित झाली.

त्यांच्या गौरवासाठी आयोजित निरोप समारंभात पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्रीनिवास चव्हाण अध्यक्षस्थानी होते. यावेळी केंद्रप्रमुख, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व गावातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी बंड मॅडम यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी अनेक विद्यार्थिनींनी आपल्या भावना व्यक्त करताना 'बंड मॅडम आमच्यासाठी केवळ शिक्षिका नव्हत्या, तर खऱ्या अर्थाने आईसारख्या होत्या,' अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली. बंड मॅडम यांनी 'शिक्षण हीच खरी ताकद आहे, ती आयुष्यभर सोबत ठेवावी,' असा मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन किन्हे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. दर्शना सोनारे यांनी केले.

> ◆ 'आजचा क्षण माझ्यासाठी अत्यंत भावनिक आहे. ३४ वर्षांचा सेवाप्रवास संपत असला तरी आलेगाव कन्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनी माझ्या हृदयात कायम राहील. मी त्यांना नेहमी माझ्या मुलीप्रमाणे जपले. मला सहकारी, विद्यार्थी व गावकऱ्यांचे नेहमीच प्रेम व सहकार्य मिळाले, त्याबद्दल मी सर्वांची आभारी आहे. शिक्षण हेच खरे बळ आहे, ते सर्वांनी जपावे, हीच अपेक्षा.'
>
> **प्रतिभा रामेश्वर**, बंड शिक्षिका

## नरेंदर कब मिलेगा सिलेंडर राज्यव्यापी आंदोलन



देशात गॅस टंचाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे. नागरिकांना रांगेत उभे राहावे लागत आहे. यासाठी केंद्र सरकारचे नरेंद्र मोदी जबाबदार असून गॅस सिलेंडरचा पुरवठा नियमित करावा, अश्या विविध मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. अकोला येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने 'नरेंदर कब मिलेगा सिलेंडर' राज्यव्यापी आंदोलन आंदोलन करण्यात आले. चुलीवर भाकर बनवून जिल्हाधिकाऱ्यांना तयार केलेले जेवण, मागण्यांच्या निवेदनासह देण्यात येणार आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

# गाय आपली संस्कृती ? आणि अर्थव्यवस्थेचा मानबिंदू

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला:** गाय ही केवळ प्राणी नाही, ती आपल्या संस्कृतीची आणि अर्थव्यवस्थेची शान आहे. तिचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. गोरक्षणातून आपल्याला सेंद्रिय शेतीचा मार्ग सापडतो, पर्यावरणाचे संतुलन राखले जाते आणि आरोग्यही सुधारते, असे विचार नगरसेवक अॅड. गिरीश गोखले यांनी येथे काढले.

देशमुखफैलमधील श्रीसंत गजानन महाराज मंदिराच्या परिसरात तेथील तरुणांनी उभारलेल्या गोशाळेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अॅड. गोखले आणि शंकरलालजी शर्मा यांच्या हस्ते या गोशाळेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिराचे अध्यक्ष तथा माजी महापौर सुरेश भाऊ पाटील, तर प्रमुख अतिथी, श्रीराजराजेश्वर मंदिराचे विश्वस्त गजाननभाऊ घोंगे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत पिसे पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती व्यासपीठावर होती.अॅड. गोखले पुढे म्हणाले की, गोशाळा उभारल्याने निराधार गायींना आधार मिळतो आणि गावागावात रोजगाराच्या संधी निर्माण होतात. तरुणांमध्ये ताकद आहे, विचार आहे आणि बदल घडवण्याची क्षमता आहे. समाजातील तरुण पुढे आल्यास गोरक्षण ही केवळ कल्पना राहणार नाही, तर ती यशस्वी चळवळ बनू शकते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक गोशाळा उभारण्यावर तरुणांनी भर देऊन स्वावलंबनाचा आणि समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण करावा. गोरक्षण ही केवळ परंपरा नाही तर भविष्य घडवण्याची संधी आहे. गोरक्षणाला जनआंदोलन बनवून समाजाला, पर्यावरणाला व देशाला नवी दिशा तरुणांनी द्यावे, असे आवाहन शेवटी त्यांनी केले.

### संत गजानन महाराज मंदिर परिसरात गौरक्षण गोशाळेचे उद्घाटन संपन्न



# गोवंश तस्करी व कत्तलीला उधाण; गोवंश हत्या बंदी कायदा कागदावरच?

प्रतिनिधी ६ एप्रिल

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यात अडगाव, हिवरखेड, तळेगाव बाजार, बेलखेड, पंचगव्हाण, माळेगाव बाजार ही गो तस्करी व गोमांस विक्रीची मुख्य केंद्रे असून तालुक्यातील विविध गावातून मोठ्या प्रमाणात गोवंशाच्या वाढत्या चोऱ्या व त्यांचा शोध न लागणे ही चिंताजनक बाब आहे. गोवंश हत्या बंदी कायदा केवळ कागदावरच असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे. केंद्र व राज्य सरकारांनी बनविलेले काही कायदे केवळ कागदावरच असल्याचे निदर्शनास येत आहे. महाराष्ट्रात गोवंश हत्या, तस्करी, अवैध वाहतूक बंदी, आणि गुटखा व पानमसाला बंदी कायदा आहे, मात्र या दोन्ही कायद्याचे थातुरमातुर पालन व अंमलबजावणी होतांना दिसून येत आहे.

तेल्हारा तालुक्यात कायद्यातल्या तरतुदीनुसार सर्वकाही जोरात होत आहे. याबाबत व्यवस्था मात्र मूग गिळून असल्याचे दिसून येत आहे. परिणामतः गोवंशाच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढतेच असल्याचे दिसून येत आहे. गुटखा बंदीचा कायदा २०१२ साली तर गोवंश हत्याबंदीचा कायदा २०१५ साली लागू झाला. हे कायदे अस्तित्वात येण्याच्या पूर्वीचे आणि आताच्या स्थितीत किती बदल झाला, हे सांगताच येत नाही, कारण दिसण्यासारखा बदलच झाला नसल्याने तो सांगणे कोणालाही शक्य नाही. आता तर अनेकांना असे काही कायदे झाले आहेत. याचाही विसर पडत आहे अनेक भागातून गोवंशाची इतकी खुलेआम तस्करी व कत्तल होत असतांना व्यवस्था मात्र मुकदर्शक झाली आहे.

# जिल्हा परिषद शाळेत इंग्रजीचे मोफत शिक्षण

प्रतिनिधी ६ एप्रिल

**हिवरखेड :** येथील शिक्षकांच्या आणि दानशूर व्यक्तींच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदच्या प्राथमिक कन्या शाळेत कॉन्व्हेंटचे मोफत शिक्षण देण्याचा प्रशंसनीय उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

सविस्तर असे की आधुनिक काळात दर्जेदार सुविधा उपलब्ध नसल्याने, शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याने, आणि शासनाची शिक्षणाप्रती उदासीन धोरणामुळे जिल्हा परिषद शाळा ओस पडायला लागल्याच्या घटना निदर्शनास येत असतात, त्यामुळे आजच्या काळात प्रत्येक पालकाचे अपेक्षा असते की आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून ते खाजगी कॉन्व्हेंट मध्ये मोठी फी भरून विद्यार्थ्यांचा प्रवेश घेतात. परंतु मजूर व कामगार वर्ग तसेच कमी उत्पन्न गटातील व्यक्ती मोठी फी भरू शकत नसल्याने ते आपल्या पाल्याच्या भविष्याच्या बाबत काळजीत असतात. गोरगरीब पालकांचेही व्यथा पाहून हिवरखेड येथील शिक्षक मंडळी आणि दानशूर व्यक्तींच्या मनात एक संकल्पना आली. आणि त्यांनी लोकसहभागातून लहान मुलांसाठी के जी १ आणि केजी २ साठी इंग्रजी माध्यमाचे शिक्षण आणि संबंधित सर्व सुविधा मोफत पुरविण्याचा चंग बांधला. त्याला हिवरखेड परिसरातील दानशूर व्यक्तींची साथ मिळत आहे. यामधून जिल्हा परिषद च्या प्रशस्त व सुंदर इमारत असलेल्या हिवरखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ई लर्निंग सुविधा, सुसज्ज संगणक कक्ष, बाल वाचनालय, प्रशिक्षित व तज्ञ शिक्षक वर्ग, बोलक्या भिंती, आदर्श वर्ग रचना, डिजिटल शाळा या सुविधा अस्तित्वात असून विद्यार्थी लाभाच्या अनेक योजना आखण्यात आले आहेत यामध्ये मोफत गणवेश मोफत पाठ्यपुस्तके शालेय पोषण आहार मोफत आरोग्य तपासणी पात्र लाभार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती आणि विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन असे नियोजन आहे.




ह्या उपक्रमाला दानशूर नागरिकांनी आणि संस्थांनी सढळ हाताने मदत केल्यास प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि मुलांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी मदत होईल असे मनोगत शिक्षकांनी व्यक्त केले.. त्यामुळे ज्या दानशूर व्यक्तींना या समाज उपयोगी कार्यात मदत करायची इच्छा असल्यास त्यांनी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांसोबत संपर्क साधावा असे आवाहन शिक्षिका सौ. साधनाताई भोपळे आणि शिक्षिका सौ. अपर्णाताई आमले यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

# अकोट आगाराच्या बसेस मार्ग फलकाविनाच

प्रतिनिधी ६ एप्रिल



**अकोट :** अकोट ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजली जाणारी 'लालपरी' सध्या प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. अकोट आगारातून सुटणाऱ्या अनेक बसेसला मार्ग फलक (बोर्ड) नसल्याने प्रवाशांना बस नेमकी कुठे जाणार आहे, हे ओळखणे कठीण झाले आहे.

अकोट बस स्थानकावरून दररोज शेकडो बसेस विविध मार्गांवर धावतात. मात्र, यातील निम्म्याहून अधिक बसेसला समोरच्या बाजूला अधिकृत मार्ग फलक नाहीत. काही ठिकाणी बोर्डाच्या जागी हाताने लिहिलेले कागद चिकटवलेले दिसतात, तर अनेक बसेस कोणताही बोर्ड न लावताच स्थानकात उभ्या राहतात. यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि परगावच्या प्रवाशांची मोठी तारांबळ उडत आहे.

बस समोर उभी असूनही ती कुठे जाणार आहे हे न कळल्यामुळे अनेक प्रवाशांच्या बस चुकतात. फलक नसल्यामुळे प्रवाशांना चालक किंवा वाहकाकडे सतत विचारणा करावी लागते, ज्यातून कधीकधी शाब्दिक चकमकीही उडतात. गोंधळाची स्थिती घाईघाईत चुकीच्या बसमध्ये बसण्याचे प्रकारही यामुळे घडत आहेत.

> अकोट ते जितपुर रूपागड बस शहापूर मधून परत निघून गेली लग्न सोनाळा लग्न असल्यामुळे तीस ते पस्तीस प्रवासी असूनही यांना प्रवाशांचे काही देणे घेणे नाही शालेय विद्यार्थ्यांचाही नुकसान नाहक त्रास होत आहे,
>
> **मधुकर सोलकर**
> जीतापूर (रूपागड)

> अकोट ते जितोल्या काही दिवसापासून विद्यार्थ्यांचा व प्रवाशांना होणारा हा मानसिक त्रास व खिशाला लग्नाला भुर्दंड हा खपून घेतल्या जाणार नाही तात्काळ दुरुस्ती न झाल्यास येणाऱ्या आठ दिवसात प्रहार स्टाईलने आंदोलन केल्या जाईल,
>
> **श्रीजीत कराळे,**
> प्रहार उपजिल्हाप्रमुख

> डेपो मध्ये मार्ग फलक असताना लावणे आवश्यकच आहे मार्ग फलक न लावणाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक आहे
>
> **अरविंद पिसोडे,**
> आगार व्यवस्थापक

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

**माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**
**गायत्री नगर. अकोला**

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार




मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९,
९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# शिवमहापुराण कथेला लोटला लाखोंचा भक्तीसागर

प्रतिनिधी ६ एप्रिल





**आर्णी :** येथील माहूर रोडवरील भारती यांच्या शेतात आयोजित शिवमहापुराण कथेला अभूतपूर्व प्रतिसाद लाभत शेवटच्या दिवशी लाखोंच्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावत भक्तीसागर उसळला. श्री बहिरमदेव शिवपुराण कथा आयोजन समिती ट्रस्टच्या वतीने आयोजित या कथेला ३० मार्च ते ५ एप्रिलदरम्यान जगप्रसिद्ध कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा (सीहोरवाले) यांच्या अमृतवाणीचा लाभ मिळाला.

कथेच्या संपूर्ण कालावधीत दररोज मोठ्या संख्येने भाविक आर्णीत दाखल झाले. अवकाळी पावसामुळे काही दिवस अडचणी निर्माण झाल्या; मात्र आयोजन समिती, सेवाभावी संस्था आणि स्वयंसेवकांनी प्रभावी व्यवस्थापन करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. हजारो सेवेकऱ्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडत आयोजन यशस्वी केले.

पोलीस प्रशासनानेही सुरळीत वाहतूक व सुरक्षेची जबाबदारी पार पाडताना माणुसकीचे दर्शन घडवले. या धार्मिक सोहळ्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे उदाहरणही पाहायला मिळाले. मुस्लिम बांधवांनी शरबत वाटप करत सामाजिक सलोखा अधोरेखित केला.

भाविकांनी आर्थिक मदत, अन्नदान तसेच श्रमदानातून सहभाग नोंदवला. प्रसारमाध्यमे व सामाजिक माध्यमांवरून कथेचा व्यापक प्रचार झाला. समारोपाच्या दिवशी आयोजन समिती सदस्य व सेवेकरी भावुक झाले. डोळ्यात आलेले अश्रू हे समाधान व आनंदाचे असल्याचे वातावरण होते. शेवटच्या दिवशी उसळलेल्या गर्दीमुळे उपस्थितीचा नवा विक्रम प्रस्थापित झाल्याचे मानले जात आहे. आर्णीत पार पडलेल्या या भव्य धार्मिक आयोजनाची नोंद कायमस्वरूपी इतिहासात सुवर्णाक्षरांनी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# विनापरवाना लाउडस्पीकर्सवर कारवाई

प्रतिनिधी ६ एप्रिल



**पुसद :** उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांच्या निर्देशांनुसार पुसद शहरात ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर पावले उचलण्यात येत आहेत. विनापरवाना लावण्यात आलेल्या लाउडस्पीकर व भोंग्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर पुसद शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व धार्मिक व सामाजिक स्थळांवरील विनापरवाना लाउडस्पीकर काढून टाकण्याबाबत प्रशासनाने यापूर्वी तीन बैठका घेऊन सूचना दिल्या होत्या. नियमांचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला होता. दरम्यान, ४ एप्रिल २०२६ रोजी संभाजीनगर येथील लुंबिनी बुद्ध विहारातील विनापरवाना लाउडस्पीकर स्थानिक महिला मंडळ व 'जागो भीमसैनिक मित्र मंडळ' यांच्या सदस्यांनी स्वेच्छेने काढून घेतले.

यावेळी ठाणेदार सेवानंद वानखेडे, पोउपनि राजू ठोमरे तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते. संबंधितांनी पुढेही नियमांचे पालन करण्याचे आश्वासन दिले. पोलीस प्रशासनाने या कृतीचे स्वागत करत सर्व धार्मिक व सामाजिक संस्थांनी स्वयंस्फूर्तीने विनापरवाना लाउडस्पीकर काढून टाकावेत, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन केले आहे.

# एचटीबीटी बियाणांवर बंदी नको, परवानगी द्या

## शेतकऱ्यांनी दिले कृषी आयुक्तांना पत्र

प्रतिनिधी ६ एप्रिल

**यवतमाळ :** राज्यात कपाशीच्या एचटीबीटी बियाणांचा वाढता प्रसार रोखण्यासाठी कृषी आयुक्तांनी समित्या नेमून कारवाई करण्याचे आदेश स्थानिक पातळीवर दिले आहेत. शेतकऱ्यांबरोबर, यात कापड उद्योगाचे नुकसान होत आहे. यामुळे एचटीबीटी बियाणांवरील बंदी हटवून त्वरित प्रगत बियाणांला परवानगी द्यावी, अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी कृषी आयुक्तांकडे केली आहे.

राज्याच्या कृषी आयुक्तांनी एक बैठक घेऊन राज्यात वेगाने पसरणाऱ्या एचटीबीटी बियाणांची लागवड रोखण्यासाठी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. एकट्या कृषी विभागाला एचटीबीटी बियाणांची तस्करी रोखणे अशक्य असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय व पोलिस यंत्रणेची मदत घेतली जाणार आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात खरीप हंगामातील मान्सूनच्या पावसावर कपाशीची लागवड केली जाते. सर्व पेरणी एकाच वेळेला झाल्यामुळे पिके



खुरपणीलाही एकच वेळेला येतात. मजूरटंचाई असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना मजूर उपलब्ध होत नाही व मजुरीचा खर्च वाढतो. एचटीबीटी बियाणांमुळे पीक तणमुक्त राहते व नोंदणीचा खर्च वाचल्यामुळे कपाशीचा उत्पादन खर्च कमी होतो, पीक उत्तम येते. असाच शेतकऱ्यांचा समज आहे. गतवर्षी मोठ्या प्रमाणात एचटीबीटी वाण लावण्यात आले. याचा परिणाम म्हणून यावर्षीदेखील हे वाण विकल्या जाण्याची शक्यता आहे.

### व्हीआईपी तीन जनुकांची तपासणी करा

■ एचटीबीटीच नाही तर व्हीआईपी ३ या जनुकांचीसुद्धा तपासणी करावी. ज्या बियाणे कंपन्यांच्या बियाणांत हे प्रतिबंधित जनुक सापडेल त्यांच्यावर शासनाने कारवाई करावी. मागील वर्षी न विकलेले बियाणे पुन्हा प्रमाणित करण्यासाठी (क्राय १ व क्राय २ साठी) रसशोषक किडींना रोधक असलेले व्हीआईपी ३ हे जनुक वापरले आहे. त्यांच्या बियाणांचीसुद्धा कसून तपासणी व्हावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# महादापूर रस्त्याची दयनीय अवस्था; दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी ६ एप्रिल



**झरी जामणी :** तालुक्यातील महादापूर गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. रस्त्यावरची गिट्टी पूर्णपणे उखडल्याने खड्ड्यांचे प्रमाण वाढले असून प्रवास करणे धोकादायक बनले आहे.

दुचाकीस्वारांना विशेषतः मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. रात्रीच्या वेळी अपुरा प्रकाश व खड्ड्यांमुळे परिस्थिती आणखी गंभीर होते.

महादापूर गावात सुमारे ९० घरांची वस्ती असून गावासाठी हा एकमेव दळणवळणाचा मार्ग आहे. त्यामुळे आपत्कालीन प्रसंगी रुग्णांना दवाखान्यात नेणे किंवा तातडीची कामे पार पाडणे कठीण ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# अखेर उसाचे थकीत बिल मिळणार

प्रतिनिधी ६ एप्रिल



**उमरखेड :** थकीत ऊस बिलांच्या मागणीसाठी सुरू केलेले अमरण उपोषण अखेर मागे घेण्यात आले असून भैरवनाथ शुगर युनिटने शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्या आहेत. वसंत सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक चिंतागराव कदम यांच्या नेतृत्वाखालील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ३ ते ४ एप्रिलदरम्यान कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर आंदोलन छेडले होते.

भैरवनाथ शुगर युनिटकडे भाडेतत्त्वावर चालविण्यास दिलेल्या कारखान्याकडून ऊस उत्पादकांची देयके प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होती. गाळप हंगाम २०२५-२६ मधील ऊस बिलाच्या विलंबामुळे शेतकऱ्यांनी 'घंटानाद' करत अमरण उपोषण सुरू केले होते.

दरम्यान, कारखाना प्रशासनाने या आंदोलनाची दखल घेत दिलगिरी व्यक्त केली. चिंतागराव कदम यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर देयके टप्प्याटप्प्याने अदा करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानुसार ६ ते १० एप्रिलदरम्यान ३ कोटी, १० ते १५ एप्रिलदरम्यान ३ कोटी आणि १५ ते २० एप्रिलदरम्यान आणखी ३ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहेत.

तसेच ३१ जानेवारी २०२६ पर्यंत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल पूर्णतः अदा करण्याबरोबरच उर्वरित थकबाकी ३० एप्रिलपर्यंत चुकती केली जाईल, असेही लेखी पत्र कारखाना व्यवस्थापनाने दिले आहे. १ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारीदरम्यान गाळपास आलेल्या ऊसाचे देयकही यामध्ये समाविष्ट असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कारखान्याच्या जनरल मॅनेजरकडून लेखी हमी मिळाल्यानंतर चिंतागराव कदम व इतर शेतकऱ्यांनी उपोषण मागे घेतले. उपोषण सोडताना परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. दगडू कांबळे, बंडू कदम, शरद ठाकरे, विजय बरडे, बाळासाहेब खंदारे यांच्यासह अनेकांनी या आंदोलनात सहभाग नोंदवला.

# मुस्लिम समाजाचा सामूहिक विवाह मेळावा

प्रतिनिधी ६ एप्रिल

**दिग्रस :** अंजुमन फिदांयाने मुस्तफा व गुलशन बहुउद्देशीय शिक्षण संस्था दिग्रस यांच्या संयुक्त विद्यमाने १७ मे रोजी अंजुमन उर्दू हायस्कूलच्या प्रांगणात मुस्लिम समाज सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन केले आहे. वर, वधूंना संसारोपयोगी साहित्य निःशुल्क देण्यात येणार आहे. इच्छुकांनी आपली नावे नोंदणी मो. अतीक सेठ दिग्रस व आर्णी येथे आरीफ बॅटरीवाले, अनसार शेख इंजिनिअर, पुसद येथे सै. इस्तीयाक, डॉ. राजीक अहेमद, काळी येथे अ. शारीक अ. वहाब, दारव्हा येथे वसीम खान, महेमुद खान यांच्याकडे करावे, असे आवाहन मुस्लिम समाज सामूहिक विवाहचे प्रसिद्धी प्रमुख अफजल खान यांनी केले आहे.

# रफीक कनोजे यांना 'म.बा. मेश्राम पत्रकारिता पुरस्कार' जाहीर

प्रतिनिधी ६ एप्रिल



**झरी जामणी :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने समता पर्व २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी ७ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या या पर्वातील प्रमुख आकर्षण म्हणून "म. बा. मेश्राम पत्रकारिता पुरस्कार २०२६" जाहीर करण्यात आला आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार झरी जामणी तालुक्यातील मुकूटबन येथील पत्रकार रफीक कनोजे यांना प्रदान करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कार १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता समता मैदान, यवतमाळ येथे आयोजित समारंभात प्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत ज. वि. पवार यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. परिवर्तनवादी पत्रकारितेला चालना देण्यासाठी हा पुरस्कार प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# आर्णीत काँग्रेसचे 'सृजन संघटन अभियान'

प्रतिनिधी ६ एप्रिल



**आर्णी :** काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने आर्णी येथील धूमाजी नाईक मंगल कार्यालयात 'सृजन संघटन अभियान' अंतर्गत महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान ऑल इंडिया काँग्रेसचे निरीक्षक संजय कपूर यांनी भूषविले.

बैठकीत कार्यकर्त्यांशी संवाद साधताना कपूर यांनी आगामी राजकीय आव्हाने आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याबाबत मार्गदर्शन केले. संघटन विस्तार आणि कार्यकर्त्यांची सक्रियता वाढवण्यावर त्यांनी विशेष भर दिला. यावेळी व्यासपीठावर राज्याचे माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे, यवतमाळ जिल्हा निरीक्षक प्रभारी भैय्यासाहेब पवार, शकुर नागणी, जिल्हाध्यक्ष प्रफुल मानकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील, जिल्हा काँग्रेस कमिटीचे जितेंद्र मोघे, आर्णीचे नगराध्यक्ष नालंदा भरणे, शाहिद रायानी तसेच सोशल मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाध्यक्ष प्रफुल मानकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गटनेते अमोल मांगुळकर यांनी केले, तर आभार तालुकाध्यक्ष नरेश राठोड यांनी मानले. या बैठकीमुळे आर्णी तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, संघटन बळकट करण्याचा निर्धार अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.

# सुवर्णपदक विजेती साक्षी बुरकुलेचा सत्कार

प्रतिनिधी ६ एप्रिल



**पुसद :** पुसद येथील कु. साक्षी बंडू बुरकुले हिने रायपूर (छत्तीसगड) येथे झालेल्या पहिल्या भारत सरकार आयोजित ट्रायबल खेलो इंडिया स्पर्धेत ८२ किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकावून पुसदच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पुसद अर्बन बँकेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात तिचा सत्कार करण्यात आला.

साक्षीने जिल्हास्तर व राज्यस्तरावर यश संपादन केल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवून मोठी कामगिरी बजावली आहे. ती सध्या सवना येथे बी.कॉम.चे शिक्षण घेत असून तिच्या वडिलांचे छत्र नसताना आई रोजमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. अशा कठीण परिस्थितीत प्रशिक्षक रोशन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश मिळवले आहे.

याच वेळी वेटलिफ्टिंग क्षेत्रातील इतर खेळाडूंचाही गौरव करण्यात आला. बिहार येथे आयोजित शालेय राष्ट्रीय स्पर्धेत पूजा ठेपेकर हिने कांस्यपदक मिळविले, तर नाशिक-मनमाड येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेत पियुष आढावे आणि सुरज इंगोले यांनी रौप्यपदक पटकावले. या सर्व खेळाडूंना तसेच वेटलिफ्टिंग अकॅडमीचे प्रशिक्षक रोशन देशमुख यांनाही पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी सांगितले की, "ग्रामीण व अल्पसुविधा असलेल्या परिस्थितीतून येऊन राष्ट्रीय स्तरावर यश मिळवणे ही पुसदकरांसाठी अभिमानाची बाब आहे." हा सत्कार केवळ पुरस्कारापुरता मर्यादित नसून संघर्षातून यश मिळवणाऱ्या प्रत्येक खेळाडूसाठी प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रदर्शन नाना बेले यांनी मानले. कार्यक्रमाला के. जी. चव्हाण, गणेश दिंडे, बळवंत मनवर, ॲड. गोपाल मस्के, कैलास जळगांवकर, प्रवीण कदम, यश काळे, दत्ता शिंदे, जय दळवी, श्रीकांत वानखेडे, करण मोहिते, आवेश शेख, राहुल सोनटक्के, छत्रपती शेलकर, सुमेध बोडखे, ॲड. जुनेद शेख, सागर पारवानी, संदेश रणवीर आदी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**जाहीर प्रकटन देणार** :- जया सुनिल शेंडे,वय-38 वर्ष
धंदा-शेती/सामाजिक कार्य,
रा. राधे राधे नगर, दत्त रोड, शासकीय मुलीचे वस्तीग्रह जवळ, छत्रपती नगर,
रा. थालेगाव (पुनर्वसन), ता.पो.कळंब
जि.यवतमाळ पिन-445401
मो.न. 7028690198

**मार्फत** : अँड. व्ही.व्ही.फपाळ, जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव जि.बीड

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील जया सुनिल शेंडे रा.थालेगाव (पुनर्वसन), ता.पो.कळंब जि.यवतमाळ यांनी विक्रेत्या सतिश रामदास कोकांडे आणी सुरज रामदास कोकांडे रा.जयपूर पो.चानकी कोपरा ता.सेलू जिल्हा-वर्धा यांनी त्यांच्या प्रत्यक्ष मालकी व ताब्यातील शिवार मौजे- तिरझडा ता.कळंब जिल्हा- यवतमाळ हद्दीतील गट नं. 83/1 मधील एकूण क्षेत्र 1.25 आकारणी 2.25 पैकी 01 हे.20 आर. पोटखराब क्षेत्र 0.05 आर जिचे सामाईक क्षेत्र असून त्याची चतु:सिमा पूर्वेस:- नाला पश्चिमेस:- सुशीला वसंतराव पोटे यांची जमीन, दक्षिणेस:- तिरझडा-धोत्रा सरकारी रस्ता व उत्तरेस:- गुलाब रावबा कोकांडे यांची जमीन येणेप्रमाणे उपरोक्त वर्णनाची व चतु:सिमेच्या आतील जमीन उपरोक्त मालकाकडून कायम खरेदी करण्याचा ठराव दिनांक 05.12.2025 रोजी केलेला आहे.

सदर बैठक ही अशोक कांबळे यांचे शेतात झालेली असून या ठरावाचे वेळी, रमेश रणजीतराव कुटे, रा.भाटवडगाव ता.पो.माजलगाव जिल्हा-बीड, विक्रेतेचे स्नेही प्रफुल देविदासजी वाघाडे, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, मु.बोरीमहाल,पो.कात्री, ता.कळंब जिल्हा-यवतमाळ, सुनिल रामचंद्र शेंडे, रा.थालेगाव (पुनर्वसन), ता.पो.कळंब जि.यवतमाळ आणि अशोक कांबळे रा.मलकापूर ता.कळंब जि.यवतमाळ तसेच विक्रेतेचे पाहुणे, हे सर्वजण उपस्थित होते. सदर ठराव हा रक्कम रु.4,45,000/-प्रति एकर प्रमाणे ठरलेला होता. झालेल्या ठरावाप्रमाणे ईसारापोटी रोख रक्कम रु.1000/- त्याच दिवशी देण्यात आलेली आहे. व उर्वरित रक्कम धनादेशाद्वारे विक्रेते यांच्या सांगण्यानुसार बँक खात्यात खरेदीखत नोंदविताना सह-दुय्यम निबंधक कार्यालयात देण्याचे करण्याचे ठरलेले आहे. रक्कम पूर्ण मिळाल्यानंतर विक्रेते हे खरेदीखत नोंदवून देण्यास सह-दुय्यम निबंधक कार्यालयात जबाब देतील.त्यासाठीची असणारी शासकीय परवानगी हि विक्रेते घेणार आहेत.

सदर मिळकत निर्वेध व निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे आश्वासन व विश्वास उपरोक्त जमीन मालकाने आणि त्यांचे स्नेही यांनी दिलेले आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप किंवा हरकत किंवा कर्ज किंवा या जमिनीशी असलेले काही हितसंबध असतील तर खालील पत्त्यावर प्रत्यक्ष किंवा पोस्टाने लेखी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाचे अगोदर कळविण्यात यावे.जर याबाबत काहीही आक्षेप किंवा हरकत नाही आल्यास पुढील खरेदीकरिता आणि जमीन वहिवाट करण्यास जाहीर प्रगटन करणार हे कायदेशीर हक्कदार राहतील.सबब हे जाहीर प्रगटन.

**दिनाक- 23/03/2026**
**जाहीर प्रगटन देणार**

**मार्फत**
**अँड. व्ही.व्ही.फपाळ,**
**जिल्हा व सत्र न्यायालय-माजलगाव**
**जि.बीड. मो.न. 9420002850**

**जया सुनिल शेंडे,**
**रा.थालेगाव (पुनर्वसन),**
**ता.पो.कळंब जि.यवतमाळ**
**पिन-445401**
**मो.न. 7028690198**

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## कृषी पुरस्काराचे प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ एप्रिल पर्यंत मुदत वाढ

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. हे पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

# अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्तपदी वर्षा लड्ढा रुजू

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेच्या नव्या आयुक्त म्हणून वर्षा लड्ढा (भा.प्र.से.) यांनी आज पदभार स्वीकारला. माजी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्याकडून त्यांनी अधिकृतरित्या कार्यभार स्वीकारत शहराच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा विश्वास व्यक्त केला. महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात आयोजित पदग्रहण सोहळ्यात हा कार्यक्रम पार पडला.



आयुक्त वर्षा लड्ढा या यापूर्वी पुणे येथील महाराष्ट्र कृषी संशोधन व शैक्षणिक परिषदेत सदस्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना त्यांनी अमरावती शहराच्या विकासाला नवी दिशा देण्याचे आश्वासन दिले. महानगरपालिकेचे सुरू असलेले सर्व विकास प्रकल्प अधिक गतिमान करण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच माजी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

माजी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आपल्या मनोगतात अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. महानगरपालिकेची प्रतिमा उंचावण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सुरू करण्यात आलेले विविध प्रकल्प नवीन आयुक्त वर्षा लड्ढा यांच्या नेतृत्वात पूर्णत्वास जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यानंतर सौम्या शर्मा चांडक यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या कार्यकाळातील योगदानाचा आढावा घेत त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त श्रीकांतसिंह चौव्हान, नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, मनोज शहाळे, धनंजय शिंदे, मंगेश कडू, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, भांडार अधीक्षक मंगेश जाधव, कार्यालय अधीक्षक गुलशन मिरानी, उपअभियंता विवेक देशमुख, हेमंत महाजन, शरद तिनखेडे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, वैद्यकीय अधिकारी डॉ.संदिप पाटबागे, आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक चेतन मेश्राम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# उन्हाचा तडाखा, अवकाळी पाऊस आणि गारपीट

## ◆ आंब्याची गोडीही फिकी, फळ-भाज्यांचे दर वाढले

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** सध्या वाढत्या उन्हाच्या तीव्रतेसोबतच अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे फळे व भाज्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. या बदलत्या हवामानामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून बाजारात मालाची कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, विविध फळे आणि भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाल्याचे चित्र आहे.

बाजार समितीचा आढावा घेतला असता , सध्या मार्केटमध्ये भाजीपाल्याचे आवक कमी प्रमाणात होत आहे. उन्हामुळे पिके कोमेजत आहेत तर अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे तयार मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे बाजारातील पुरवठा घटला असून त्याचा थेट परिणाम दरांवर होत आहे. विशेषतः उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या रसाळ फळांचे दर लक्षणीयरीत्या वाढले आहेत. ही फळे आरोग्यासाठी उपयुक्त असल्याने ग्राहकांची मागणी कायम असली तरी वाढत्या



किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला झळ बसत आहे.

उन्हाळा म्हटला की, सर्वांच्या मनात सर्वात सर्वांचे आवडते फळ फळ म्हणजे आंबा. फेब्रुवारीपासून बाजारात दाखल होणाऱ्या आंब्याची चव आणि त्याच्या रसाची गोडी ही प्रत्येकाच्या आवडीची असते. मात्र यंदा बदलत्या हवामानामुळे आंब्याच्या उत्पादनावरही परिणाम झाला असून, आंब्याचे दर वाढले आहेत. त्यामुळे पूर्वीसारखी आंब्याच्या रसाची ओढ आणि आनंद यंदा कमी झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

दुसरीकडे, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याची गंभीर समस्या समोर आली आहे. बाजारात मालाला कमी दर दिला जात असताना बाहेरील विक्रीमध्ये मात्र कृत्रिमरीत्या दर वाढवले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मध्यस्थांचा फायदा होत असून शेतकरी मात्र तोट्यात जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

बाजार समितीच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्या पुरवठा कमी आणि मागणी जास्त असल्यामुळे दर वाढत आहेत. मात्र हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान वाढत असून त्यांना योग्य मोबदला मिळणे अत्यावश्यक आहे.

एकूणच, उन्हाचा तडाखा, अवकाळी पाऊस, गारपीट आणि कृत्रिम दरवाढ यामुळे फळ-भाज्यांच्या बाजारात अस्थिरता निर्माण झाली असून यावर नियंत्रणासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

# कापसाला उसळी; दर थेट ८,३०० वर, शेतकऱ्यांसाठी दिलासादायक संकेत

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** कापसाच्या दरात सध्या मोठी वाढ झाल्याने शेतकऱ्यांसाठी दिलासादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. बाजारात कापसाचा दर थेट ८,३०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचला असून, गेल्या काही दिवसांतील ही मोठी उसळी मानली जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, डॉलरचा वाढलेला दर आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ याचा थेट परिणाम कापूस बाजारावर दिसून येत आहे.

डॉलर मजबूत झाल्यामुळे आणि क्रूड ऑईलच्या किमती वाढल्यामुळे पॉलिस्टर कपड्यांचे उत्पादन महाग झाले आहे. त्यामुळे वस्त्रोद्योगात नैसर्गिक कापसाची मागणी वाढली आहे. याच कारणामुळे जागतिक बाजारात कापसाच्या दरात वाढ झाली असून, त्याचा परिणाम स्थानिक बाजारातही जाणवत आहे. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचा दर ९१ सेंट प्रति पाउंडपर्यंत गेला आहे.

स्थानिक बाजारात सर्कीच्या दरातही वाढ झाली आहे. पशुखाद्यासाठी सर्कीची मागणी वाढल्याने सर्कीचे दर तेजीत आहेत. जिनिंग प्रेसिंग चालकांनी कापसाची खरेदी वाढवली असली तरी बाजारात आवक कमी असल्याने दर वाढले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी दरवाढीच्या अपेक्षेने कापूस साठवून ठेवला असल्याने बाजारात पुरवठा मर्यादित आहे.

दरम्यान, जागतिक पुरवठा साखळीत अडचणी निर्माण झाल्यामुळे भारतीय कापसाला मोठी मागणी मिळत आहे. यामुळे यंदा कापूस उत्पादकांना चांगला फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, काही व्यापाऱ्यांच्या मते, सध्याच्या दरवाढीचा पूर्ण लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांना मिळेलच असे नाही, कारण बहुतांश शेतकऱ्यांनी आधीच कमी दरात कापूस विक्री केली आहे. एकूणच, कापसाच्या दरातील ही वाढ शेतकऱ्यांसाठी आशादायक असली तरी पुढील काळात बाजारातील स्थिती कशी राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अर्जुन नगरवासीयांनी वाचला समस्यांचा पाढा

## ◆ घाणीचे साम्राज्य आणि नियोजनशून्य कारभाराविरोधात खासदार व लोकप्रतिनिधींकडे गाऱ्हाणे

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती:** अर्जुन नगर आणि परिसरातील गंभीर नागरी समस्यांबाबत आज परिसरातील शेकडो नागरिकांनी खासदार बळवंतभाऊ वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर, मनपाचे विरोधी पक्ष नेते विलासभाऊ इंगोले आणि बबलूभाऊ शेखावत यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी नागरिकांनी केवळ रस्ते आणि पायाभूत सुविधाच नव्हे, तर परिसरात पसरलेल्या घाणीच्या साम्राज्याबद्दलही तीव्र संताप व्यक्त केला.



अर्जुन नगर परिसरात सध्या घाणीचे प्रचंड साम्राज्य पसरले असून नियमितपणे कचरा उचलला जात नाही. घंटागाड्या वेळेवर येत नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले आहेत, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रशासनाने तातडीने स्वच्छतेकडे लक्ष द्यावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली. जवळपास १५,००० नागरिकांच्या रहदारीसाठी केवळ २० फुटांचा रस्ता शिल्लक ठेवण्यात आला आहे. नवीन ले-आउट्सना मंजुरी देताना जुन्या वहिवाटीचे रस्ते नकाशातून गायब करण्यात आल्याचा आरोप रहिवाशांनी केला. 'सृष्टी रॉयल पार्क' सारख्या प्रकल्पांच्या नकाशांची पुनर्तपासणी करून दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

अमरावती-नागपूर महामार्गावर अर्जुन नगर स्टॉप ते शिंगोरे लॉन रोड दरम्यान परशुराम कॉलनी, मेडिकल कॉलनीसाठी योग्य ठिकाणी 'कट' नसल्याने अपघात वाढत आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी येथे तातडीने चौक निर्माण करावा.

परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी भव्य 'प्रवेशद्वार' उभारणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात ५ हाय-मास्ट (highed-Mast) दिवे लावण्याची विनंती खासदार निधीतून करण्यात आली.

यावेळी आपल्या भागातील समस्या मांडण्यासाठी राहुल इंगळे, प्रमोद खंडारे, पंजाबराव मात्रे, दिलीपराव केणे, प्रेमराजजी बनारसे, विशाल पाचघरे, आशिष खोजे, विवेक नाकाडे, विरेंद्र भट, स्वप्नील देशमुख, नवनीत पाचघरे, निखिल रामटेके, अतिन देशमुख, विशाल पवार, अंकुश काळे, प्रशांत कोराट, प्रतिक देशमुख, अभिजीत महल्ले, शुभम पतिंगे, महेश राऊत, बाबुराव राऊत, श्रीकांत देशमुख, नीरज निस्ताने, दिपक कोहळे, विवेक अलोलकर , विजय तराळ, सचिन निस्ताने, प्रविण गावंडे, यांच्यासह परिसरातील अनेक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्यानंतर खासदार बळवंतभाऊ वानखडे आणि ॲड. यशोमतीताई ठाकूर यांनी या प्रश्नांची तातडीने दखल घेण्याचे आश्वासन दिले. 'प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून, स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावून आणि नगररचना विभागाच्या कामकाजाची चौकशी लावून नागरिकांना न्याय मिळवून देऊ,' असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# मनसे व उबाठाचे शेकडो पदाधिकाऱ्यांनी घेतला आ. रवि राणा यांच्या उपस्थिती युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जाहीर प्रवेश

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** शंकर नगर येथील कार्यालयात मनसेचे शहर संघटक बबलु आठवले व उबाठाचे युवा सेना उपजिल्हाप्रमुख पवन दळवी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा गळयात YSP चे दुपट्टे टाकुन व पुष्पगुच्छ देऊन आ.रवि राणा यांनी केले स्वागत

युवा स्वाभिमान पार्टी ही सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष –आ.रवि राणा यांच्या कार्यपद्धतीवर व जनहिताच्या भूमिकेवर विश्वास ठेवून घेतला निर्णय घेतल्याचे बबलु आठवले, पवन दळवी त्यांनी सांगितले.



शहरातील राजकीय घडामोडींना वेग येत असताना आज शंकर नगर येथील युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यालयात मोठा राजकीय प्रवेश सोहळा पार पडला. रवि राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत मनसे व उबाठा गटातील शेकडो पदाधिकाऱ्यांनी युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

या प्रसंगी मनसेचे शहर संघटक बबलू आठवले व उबाठाचे युवा सेना उपजिल्हाप्रमुख पवन दळवी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भ्एझ् चे दुपट्टे परिधान करून पक्षात प्रवेश केला. नव्याने प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आ. रवि राणा यांनी पुष्पगुच्छ देऊन व हार घालून स्वागत केले. कार्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना आ. रवि राणा यांनी सांगितले की, 'युवा स्वाभिमान पार्टी ही सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष आहे. शहरातील विविध भागांतून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते पक्षात येत असल्याने संघटन अधिक मजबूत होत आहे. जनतेच्या विश्वासावर आम्ही पुढील काळात अधिक जोमाने काम करू.'

कार्यक्रमात सहभागी झालेल्या नव्या कार्यकर्त्यांनीही आपली भावना व्यक्त करताना सांगितले की, आ. रवि राणा यांच्या कार्यपद्धतीवर व जनहिताच्या भूमिकेवर विश्वास ठेवून त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

येत्या काळात शहराच्या विकासासाठी आणि जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी ते पक्षासोबत कार्यरत राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आज अमरावती शहरातील विविध पक्षांतील कार्यकर्ते स्वखुशीने युवा स्वाभिमान पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. हा केवळ पक्षविस्तार नाही, तर जनतेचा आमच्यावर वाढत असलेला विश्वास आहे.

# महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते संगणक विभाग प्रमुख सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे यांचा गौरव

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती :** शासनाचा महत्त्वकांक्षी उपक्रम मुख्यमंत्री १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्यस्तरीय मूल्यमापनात अमरावती महानगरपालिकेने २९ महानगरपालिका मधून पाचवा क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, विदर्भ व मराठवाडा विभागातून या मानाच्या यादीत स्थान मिळवणारी अमरावती महानगरपालिका ही एकमेव संस्था ठरली आहे. सदर स्पर्धेमध्ये आपले सरकार तक्रार निवारण पोर्टल व्हाट्सअप चॅटबोट महानगरपालिकेचे संकेतस्थळ, 'माय



अमरावती ॲप', शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत सेवांचे डिजिटायझेशन व नवीन वेब पोर्टल्सची निर्मिती, माननीय मुख्यमंत्री डॅशबोर्ड सोबत इंटिग्रेशन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ,ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे परवाने व प्रमाणपत्रांची पडताळणी, GIS तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समावेश आहे. मर्यादित संसाधनांमध्ये ही मोठ्या महानगरपालिकांशी स्पर्धा करत ई गव्हर्नन्स मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संगणक विभाग प्रमुख सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे व त्यांच्या चमूचे प्रशस्तिपत्र देऊन गौरव केला व उल्लेखनीय कामाबद्दल कौतुक करून पुढील भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. पुढेही नागरिक केंद्रित डिजिटल सेवा देण्याकरिता प्रयत्न करत राहू अशी आशा व्यक्त केली.

# सिपनात बुडून दोन बहिणींचा मृत्यू!

## ◆ धाकट्या बहिणीला वाचवायला ताईचीही नदीत उडी

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती:** धारणी तालुक्यातील दिया गावाजवळून वाहणाऱ्या सिपना नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दोन अल्पवयीन बहिणींचा बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी घडली. लहान बहिणीला वाचवण्याच्या प्रयत्नात थोरलीही बुडाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

आस्था आनंद गिरी (१२) आणि अनू आनंद गिरी (१४), अशी मृत बहिणींची नावे आहेत. रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास या दोन्ही बहिणी गावातील इतर मुला-मुलींसोबत सिपना नदीकाठी गेल्या होत्या. खेळता-खेळता आस्थाला पाण्याचा अंदाज आला नाही आणि ती खोल प्रवाहात ओढली जाऊ लागली. आपली धाकटी बहीण बुडत असल्याचे पाहताच, अनुने जीवाची पर्वा न करता तिला वाचवण्यासाठी नदीत उडी घेतली. मात्र, पाण्याचा प्रवाह आणि खोली जास्त असल्याने दोघींचाही संघर्ष अपयशी ठरला. काही क्षणांतच त्या दोघीही दिसेनाशा झाल्या.

सोबत असलेल्या मुला-मुलींनी आरडाओरडा केल्यावर गावकरी तातडीने नदीकाठी धावून आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी स्थानिक मच्छिमारांच्या मदतीने शोधमोहीम राबवली. काही वेळाने दोन्ही मुलींचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठवण्यात आले असून, वरिष्ठ पोलिस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# महावितरणचा मोठा निर्णय; महावितरण सार्वजनिक करणार डिफॉल्टर ग्राहकांची नावे

## ◆ परिमंडळात १ लाख ७१ हजार डिफॉल्टर ग्राहक

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अमरावती:** मार्च महिन्यातच नाही, तर गत वर्षभरापासून महावितरणच्या वसूली मोहिमेला न जुमानता वीज बिल न भरणाऱ्या परिमंडळातील १ लाख ७१ हजार वीज ग्राहकांकडे ३५ कोटी २३ लाख रूपयाचे वीजबिल थकीत आहे. महावितरणने या सर्व डिफॉल्टर वीज ग्राहकांची नावे सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला असून कायदेशीर कारवाई करण्यासाठीही महावितरण सरसावले आहे.

मुख्य अभियंता अशोक साळुंके म्हणाले की, वीज बिलाच्या वसूलीवरच महावितरणचे अस्तित्व आहे, तसेच अखंडित सेवा देण्यास महावितरण बांधिल आहे आणि त्यादृष्टिने वीज सेवा सुधारण्यासाठी कर्मचाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येत असतांना, वीज बिल न भरणाऱ्या प्रवृत्तीमुळे कर्मचाऱ्यांना नाईलाजास्तव वीजबिलाच्या वसूलीवर पाठवावे लागते.

वीज ही अत्यावश्यक सेवाच नाही तर सार्वजनिक मालमत्ता आहे. त्यामुळे यापुढे आमच्या मनात आलं तर वीज बिल भरू, वीज जोडणी खंडित करायला कर्मचारी आले तर आम्ही त्यांच्याशी वाद घालू, कर्मचाऱ्यांना धमकी देवू या व अश्या प्रवृत्तिला आळा घालण्यासाठी महावितरणने कठोर पाऊले उचलली असून पहिल्या टप्प्यात महावितरण अश्या डिफॉल्टर वीज ग्राहकांची (जे वीज बिल भरत नाही), यांची नावे सार्वजनिक करणार आहे. वर्तमान पत्राच्या माध्यनातून नावे प्रसिध्द करण्यासोबत प्रत्येक शाखा कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर यापुढे त्या शाखा कार्यालयातील डिफॉल्टर वीज ग्राहक कोण आहेत हे सर्वांना बघायला मिळणार आहे.

सोबत पोलिस विभागाची मदत घेवून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून त्यादृष्टीने अधीक्षक अभियंता (अमरावती) दिपक देवहाते आणि अधीक्षक अभियंता (यवतमाळ) प्रविण दरोली हे लवकरच जिल्ह्यातील पोलिस आयुक्त/पोलिस अधीक्षकांची भेट घेवून चर्चा करणार आहे.

परिमंडळात घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वर्गवारीतील अश्या डिफॉल्टर वीज ग्राहकाची संख्या १ लाख ७१ हजार असून त्यांच्याकडे अद्याप ३५ कोटी २३ लाख रूपये वीज बिलाचे थकीत आहे. यामध्ये ६८ हजार ६७२ ग्राहक अमरावती जिल्ह्यातील आहे. त्यांच्याकडे ११ कोटी ३ लाख रूपये थकीत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील यात १ लाख २ हजार ३३८ ग्राहक असून त्यांच्याकडे २४ कोटी २० लाख थकीत आहे.

परिमंडळातील डिफॉल्टर ग्राहकातील ९ हजार ४२३ ग्राहक असे आहेत, की त्यांनी एकावर्षापेक्षा जास्त कालावधी होवून एकदाही वीजबिल भरले नाही. त्यांच्याकडे ८ कोटी ४२ लाख रूपये थकले आहे. ४० हजार ७९१ ग्राहकांनी ४ महिन्यापेक्षा जास्त आणि १२ महिन्यापर्यंत बिल भरले नसल्याने त्यांच्याकडे ११ कोटी २१ लाख थकले आहे. तसेच ४५ दिवस ते ३ महिने होवूनही वीज बिल न भरणारे परिमंडळात ६९ हजार ७९७ ग्राहक असून त्यांच्याकडे ७ कोटी ९८ लाख थकले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि ६ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण

# नाही प्रस्ताव, नाही कोणाला ठाव, तरीही पठ्ठ्यांचे अनुदानात नाव !




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या घरकुलांच्या विविध योजनांमधील धक्कादायक गैरप्रकार दिवसागणिक उघड होत आहेत. पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत असल्याचे अनेक किस्से समोर येत असून रिसोड व मालेगांव तालुक्यातील काही बहाद्दरांनी पात्र यादीत नाव नसतांना सुद्धा घरकुलाचे अनुदान लाटले असल्याची खळबळजनक माहिती सूत्रांनी दिली आहे. भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची लाचखोरी यामुळे एका महत्वाकांक्षी योजनेचा सत्यानाश होत आहे. सबंधित प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे गोरगरिबांचे घराचे स्वप्न अधुरे राहत आहे. गावपातळीवरील काही ग्रामसेवक व सरपंचांकडून आर्थिक गैरव्यवहार, खोट्या याद्या आणि चुकीच्या खात्यात घरकुल अनुदान जमा झाल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. तर रिसोड तालुक्यातील काही पठ्ठ्यांनी पात्र यादीत नाव नसतांना सुद्धा घरकुलाचे अनुदान हडप केले आहे. त्यामुळे घरकुल योजनेचा भोंगळ कारभार आता चव्हाट्यावर येत आहे.

हाती आलेल्या माहितीनुसार रिसोड तालुक्यातील मोहजाबंदी, मांडवा, कुऱ्हा, लोणी बू. लोणी खु. मोप, बोरखेडी, गोहोगाव हाडे, लेहणी, गोभणी , मांगुळ झनक, नेतन्सा, अंचळ, कुकसा , केनवड, कळमगव्हाण, चांडस आदी व इतर प्रत्येक गावात खऱ्या लाभार्थ्यांची नावे यादीतून वगळून अपात्र असलेल्या धनदांडग्यांना घरकुल योजनेचा लाभ दिला असल्याची बोंब जिल्हाभर होत आहे. सोबतच रिसोड आणि मालेगांव तालुक्यातील काही ग्राम पंचायत व पंचायत समिती स्तरावर अनुदान लाटण्यासाठी कागदपत्रांमध्ये फेरफार करण्यात आला असल्याची धक्कादायक माहिती सूत्रांनी दिली आहे. यात काही गावातील लाभार्थ्यांच्या नावांमधील साम्यामुळे एकाच्या घरकुलाचे पैसे दुसऱ्याच्या खात्यात जमा झाले असल्याचे अनेक प्रकार घडले आहेत. याला ' तांत्रिक घोटाळा ' असे गोंडस नाव दिले जात आहे. पण प्रस्ताव दाखल करतांना आधार लिंक असलेला जो बँक खाते नंबर जोडला आहे त्यात कसा बदल झाला हा मात्र संशोधनाचा विषय ठरतो आहे. आणि त्यावर कळस म्हणजे, रिसोड तालुक्यातील काही गावात असे बहाद्दर निघाले आहेत की त्यांनी गावच्या सरपंचाला, ग्रामसेवकाला कुठलीही भणक न लागू देता व घरकुल पात्र यादीत नाव न येऊ देता घरकुलाचे अनुदान लाटले आहे. विशेष बाब म्हणजे या पठ्ठ्यांनी घरकुलाचे कुठलेही बांधकाम न करता शासनाचे अनुदान हडपले आहे. हा सर्व प्रकार पाहता सबंधित प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परिणामी या गैरप्रकरणाची सुई आता सबंधित स्थापत्य अभियंता व गटविकास अधिकारी यांच्याकडे सुद्धा झुकत आहे. कारण आश्चर्यकारक बाब म्हणजे काही गावात तर एकाच घरकुलाचे बांधकाम करून त्याच ठिकाणी अनेक लाभार्थ्यांनी फोटो काढून लाखों रुपयांच्या अनुदानाची उधळपट्टी केली असल्याचे बोलले जात आहे. याला सबंधित लाभार्थ्यांनी शासन व प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक केली म्हणायचे की, स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्यासाठी सबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बोगस लाभार्थ्यांना दिलेली मुभा समजायची ? हा गहन प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे या महाघोटाळ्याची विशेष पथकामार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

### बोगस लाभार्थी तज्ञ, सरपंच, ग्रामसेवक अनभिज्ञ...

प्रत्येक गावातील बेघर कुटुंबांना हक्काचे घर मिळावे म्हणून केंद्र व राज्य शासनाने घरकुलांच्या विविध योजना आणल्या आहेत. मात्र त्यासाठी काही नियम व निकष लावण्यात आले आहेत. मात्र काही गावातील तज्ञ बोगस लाभार्थ्यांनी थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संधान साधून स्थानिक सरपंच, ग्रामसेवक यांना धतूरा देण्यात आला आहे. यात काही पांढरपेशा राजकीय पुढाऱ्यांचा हातभार असल्याची माहिती समोर येत असून राजकीय दबावतंत्र वापरून हे पांढरपेशी दलाला स्वतःच्या आर्थिक स्वार्थापोटी गरिबांच्या पोटावर लाथ मारत असल्याची चर्चा ग्रामीण भागात होत आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दैनिक सिटीन्यूज सुपरफास्टने एक सामाजिक लढा उभा केला असून प्राप्त माहितीनुसार या महाघोटाळ्याचा सातत्याने पाठपुरावा करत आहे. सिटीन्यूज सुपरफास्टमध्ये या बाबत वृत्त झळकताच, ' या प्रकरणाशी आमचा कुठलाही संबंध नसून घडलेल्या व घडत असलेल्या गैरप्रकाराबाबत आम्ही अनभिज्ञ असल्याचे अनेक सरपंच सिटीन्यूज सुपरफास्टशी बोलतांना व्यक्त होत आहेत.






## घरकुल योजनेचा भोंगळ कारभार

## थोडक्यात

### कु. शुभांगी चोथमल युजीसी नेटमध्ये पीएचडी



● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

मालेगाव तालुक्यातील मेडशी येथील बबन झाडुजी चोथमल यांचे मोठे चिरंजीव संजय चोथमल यांची मुलगी कु. शुभांगी चोथमल युजीसी नेट एन्ट्रान्स पीएचडी एक्साम उत्तीण. 'अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' ( ळउण ) नवी दिल्ली यांच्या मार्फत घेतल्या गेलेल्या सहाय्यक, प्राध्यापक पद, जे आर एफ आणि पीएचडी राष्ट्रीय पात्रता परीक्षा ( र्‍ऊ) तील पीएचडी एन्ट्रान्स परिक्षा पहिल्याच प्रयत्नात पीएचडी प्रवेश मिळवला. या निमित्ताने रिसोड / मालेगाव मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी पत्रकार अजय चोथमल यांच्या निवासस्थानी कु. शुभांगी संजय चोथमल यांना पुष्पगुच्छा देऊन स्वागत केले. या वेळी सरपंच शे. जमिर शे. गणीभाई, माजी जिल्हा परिषद सदस्य आत्माराम धंदरे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक नितीन दिलीपराव जाधव, बबलू जैन, मोहन राठोड, पिंटू पाटील, गोरखनाथ भागवत, प्रसाद पाठक, दिपक वानखडे, करवते सर, बबनराव चोथमल, संजय चोथमल यावेळी उपस्थित होते.

### बिटोडा भोयर येथे वादळी वाऱ्यामुळे नुकसान

#### संबंधित विभागाने तात्काळ मदत द्यावी



● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

मंगरुळपीर तालुक्यातील ग्राम बिटोडा भोयर येथे ३ एप्रील रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान झालेल्या पाऊस आणि वादळी वा-यामुळे गावातील काही लोकांच्या घरावरील टीनपत्रे उडाल्यामुळे घराचे मोठे नुकसान झाले असून त्यांना पंचनामे करून नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत देण्यात यावी

तर काही लोकांच्या घरावरील टीनपत्रे उडाल्याने त्यावर ठेवलेले दगड घरात पडुन काही महीलांना मुका मार लागल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत . तसेच काही शेतक-यांच्या गुरा ,ढोरांच्या गोठयावरील टीनपत्रे उडाल्याने त्यांचे सुध्दा नुकसान झाले आहे. तसेच गावातील क्षितीग्रस्त घर पडल्यामुळे बरेच संसार उघड्यावर आल्याचे पाहायला मिळत आहे. घरात असलेले जीवनावश्यक वस्तू पावसामुळे खराब झाले तसेच काही नागरिकांची खायचे वांदे झाल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे.म्हणून संबंधित विभागाने तात्काळ सर्वे करून मदत द्यावी अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे. तरी या आलेल्या तूफानी वा-यामुळे घराचे व तसेच घरातील जीवनावश्यक वस्तुंचे नुकसान झाल्याने ,आर्थिक नुकसान भरपाई मिळावी अशी नुकसानग्रस्त गरीब जनतेची प्रशासनाकडे मागणी होत आहे . घनशाम पाटील भोयर डीलर यांच्या घरावरील ५० पत्र्याचे शेड जवळपास १०० फुट अंतरावर जाऊन पडले सुदैवाने याच्यात कुठलेही जीवितहानी झालेली नसून रस्त्यावर व भीतीच्या कडेला पडल्यामुळे मोठा अनर्थ टळला.


## अल्पसंख्यांक संस्थेचा अनुदानाचा निधी...

# शिक्षणाधिकाऱ्याचा स्व-दानासाठी वादातून विधी !

### अल्पसंख्यांक संस्थांच्या वादात शिक्षण विभाग मालामाल * 'त्या' संस्थांमधील गैरप्रकारात शिक्षणाधिकाऱ्यांचा सहभाग

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यात सद्या धर्म आणि भाषिक अल्पसंख्यांक संस्थांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या अनपेक्षीत वाढीने केंद्र व राज्य सरकारकडून अल्पसंख्यांक संस्थेसाठी मिळणारा लाखो रुपयाचा निधी शिक्षण विभाग आणि संस्थाचालक संगनमताने लाटत असल्याची चर्चा आहे. या सर्व गैरप्रकाराला शिक्षण विभागच जबाबदार असल्याने शासनाने कथित संस्थाचालकांच्या सोबतच शिक्षण विभागातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तातडीने फौजदारी कारवाई करावी अशी जनतेची मागणी आहे








वाशीम जिल्ह्यात सर्वाधिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या संस्थामध्ये मुस्लीम धर्मीयांच्या संस्था आहेत.त्यानंतर जैन धर्मीय,बौद्ध धर्मीय यांच्या संस्था आहेत.आता बंजारा समाजाने सुद्धा त्यांच्या संस्था 'लमाणी' नावाने अल्पसंख्यांक करून घेण्यासाठी पुढाकार घेतल्याची चर्चा आहे. या सर्व अल्पसंख्यांक संस्थाना संस्थेद्वारा संचालीत शाळा,महाविद्यालयामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून विशेष निधी मिळतो.काही कथित संस्थाचालक त्यांच्या संस्थेचे अल्पसंख्यांक संस्थेमध्ये विलीनीकरण करून डायरेक्ट नोकरभरतीच्या माध्यमातून झटपट करोडपती होण्याच्या मार्गावर असल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. या संस्थेमध्ये खुलेआम सुरू असलेले सर्व गेरप्रकार शिक्षण विभागाच्या सहकार्यानेच होत असल्याने शिक्षण विभागच प्रथमदर्शनी दोषी असल्याचे समजते. तसेच इतर धर्मीय व भाषिक अल्पसंख्यांक संस्थेमध्ये दोन गटात चॅरीटीमध्ये वाद सुरु आहेत.अनेक संस्थेने दर तिन वर्षाने अल्पसंख्यांक संस्थेच्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण केलेले नाही.अनेक संस्थेमध्ये वाद सुरू असल्याचे शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना माहित असूनही स्वत:चा आर्थिक फायदा व्हावा या हेतूने कथित अधिकारी आणि कथित संस्थाचालक यांची मिलीभगत झाल्याने दोघांनाही मालामाल होण्याची सीवर्णसंधी प्राप्त झाल्याचे दिसत आहे. ज्या अल्पसंख्यांक संस्थेमध्ये वाद आहेत त्या संस्थेमध्ये पदभरती करताना पवित्र पोर्टलच्या माध्यमातूनच करावी लागते.परंतु वाशीम जिल्ह्यात अनेक वादातित संस्थेमध्ये शिक्षण विभागाच्या सक्रीय सहभागातून नियमबाह्य पदभरती सुरू असल्याचीही चर्चा आहे.

काही अल्पसंख्यांक शाळेमध्ये रिक्त असलेल्या मुख्याध्यापकाचे पद सेवाज्येष्ठतेनुसारच भरण्याचे शासनाचे नियम आहेत.परंतु आर्थिक लाभापोटी शिक्षण विभागातील भ्रष्ट जाणूनबुजून असे गैरप्रकार करून शिक्षण विभाग आणि शासनाला बदनाम करत असल्याचे समजते. जिल्ह्यातील अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या सर्व संस्थांची प्रामाणिकपणे चोकशी करावी अशी मागणी जागरूक नागरिकांकडून केल्या जात आहे.

### भरती घोटाळ्याचा २०१४ पासून सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...

#### दोन शिक्षण अधिकारी निलंबीत , अनेक शाळांवर गुन्हे दाखल

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती,पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले.नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग,आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे ,तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे.या प्रकरणी सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. काही शाळांनी तर खोटे वृत्त छापल्यामुळे सिटी न्युज सुपरफास्टवरच गुन्हे दाखल केले आहेत.

## भ्रष्ट शासन, धान्याचे राशन, दुकानदाराचे पोषण, गरीबांचे शोषण

# वारसासाठी नियमाचे उल्लंघन, भ्रष्टाचाराचे अवलंबन !

### * कोट्यवधीची उलाढाल, पिढ्यांपिढ्या राशन दुकानदार झाले मालमाल

● सिटी न्युज ब्युरो @वाशीम ●

जिल्हा व तालुका पुरवठा विभागात भ्रष्टाचाराची अनागोंदी जगजाहीर असून वारसाच्याच नावानेच दुकानाच्या नोंदी झाल्या आहेत. राशन दुकानावर पिढ्यांपिढ्या एकाच कुटुंबातील व्यक्तींचा ताबा आहे. त्यामुळे राशन डिलरचे कुटुंबे राशनचा काळाबाजार करून कोट्यधीश झाले आहेत. त्यामुळे पिढ्यांपिढ्या नियमात नसलेल्या वारसाकडील दुकानाचे परवाने रद्द करून नवीन जाहीरात काढून बचत गटांना द्यावे अशी मागणी होत आहे.

तात्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी व तात्कालीन त्या तालुक्यातील तहसीलदार यांनी नियमांमध्ये बगल देऊन स्वस्त धान्य दुकानदाराच्या नावे त्यांच्या वारसाचे नावे प्राधिकार पत्र करून देण्यात आले आहेत.







यामध्ये मोठ्या प्रमाणावर अर्थपूर्ण लागेबांधे असल्यामुळे वारसाचे प्राधिकार पत्र झाले आहे मुळात अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या २२ डिसेंबर १९९७ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या माहितीनुसार ज्या स्वस्त धान्य दुकानदाराच्या वारसाचा उदरनिर्वाह स्वस्त धान्य दुकानावर अवलंबून आहे त्यांनाच अशा प्रकारची प्राधिकार पत्र द्यावे अशा प्रकारची त्यामध्ये तरतूद असताना तात्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी एक मीटिंग घेऊन त्यामध्ये सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना याच्यामध्ये कशा प्रकारची पळवाट काढून मी तुम्हाला वारसाच्या नावे प्राधिकार पत्र करून देतो अशा प्रकारची माहिती सांगितल्यामुळे सहाही तालुक्यातील जवळपास ५० टक्के पेक्षा जास्त स्वस्त धान्य दुकानदारांनी आपल्या दुकानाची प्राधिकार पत्रे ते दुकानदार जिवंत असताना व चुकीची माहिती देऊन मी आजारी असतो मला पाठीचा आजार आहे मी धान्य दुकान चालविण्यासाठी सक्षम नाही अशा प्रकारे खोटी माहिती देऊन वारसाचे नावे संबंधीत दुकानाचे प्राधिकार पत्र करून घेतली आहे त्या संपूर्ण दुकानाची माहिती घेऊन त्यांच्या नावे असलेली जंगम व स्थावर मालमत्तेची संपूर्ण माहिती घेऊन त्या दुकानाचे प्राधिकार पत्र रद्द करावे व त्या दुकानाची नव्याने जाहिरात काढून अशाप्रकारे संबंधित दुकानाचा परवाना गरजवंत व्यक्तीला द्यावा अशी मागणी संपूर्ण जिल्ह्यातून होत असून या प्रकरणात जिल्हा पुरवठा अधिकारी काय भूमिका घेतात व कोणत्या दुकानावर काय कार्यवाही होते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक नेमलेल्या गावात गैरहजर राहत असल्याची ओरड !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील विविध गावातील तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक हे नेमलेल्या गावात येत नसल्याची सर्वत्र ओरड होत आहे. त्यामुळे गावातील लोकांना आपली कामे बाजूला सारून तालुक्याच्या ठिकाणी यावे लागत आहे. त्यातही शहरातही ही मंडळी सापडत नसल्याने शेतकऱ्यांना नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. सध्या शेतकऱ्यांना पीक कर्जाची धामधूम सुरू आहे.

यासाठी आवश्यक ती कागदपत्रे असल्याशिवाय पुढील कामे होत नाही. बहुतेक शेतकऱ्यांना अजूनही दुष्काळ निधीची अतिवृष्टी, पिक विमा आदी शासनाचा निधी मिळालेला नाही. घरकुल योजनेसाठी देखील मोठ्या प्रमाणावर कागदपत्रे जुळवाजुळव करावी लागतात. अशावेळी त्यांना तलाठी मंडळ अधिकारी, ग्रामसेवक गावात मिळत नाहीत. त्यामुळे या मंडळीवर अतिरिक्त गावचा पदभार असल्याचे कारण पुढे केले जात आहे. याचाच फायदा घेऊन वरील कर्मचारी मंडळी दांड्या मारत आहेत. वरिष्ठ अधिकारी देखील कुठल्याही प्रकारची कार्यवाही करीत नाहीत ही तालुक्याची शोकांतिका आहे. कर्मचाऱ्यांचे संबंधित त्या त्या विभागाने अशा दांडीबाज कर्मचाऱ्यावर कारवाई करणे गरजेचे असताना तसे होत नाही. प्रत्येक गावच्या सरकारी कामासाठी प्रत्येक ठिकाणी शासनाने कर्मचारी नेमलेले आहेत व त्यांना गावाला भेटी देऊन तिथले काम करण्याकरिता दिवस नेमून दिले आहेत. परंतु नेमून दिलेल्या दिवशी नेमलेले कर्मचारी नियमित गावात येत नसल्याचे चित्र दिसून येते. यामध्ये ग्रामसेवक ,तलाठी, कृषी सहाय्यक हे तीन घटक ग्रामीण विकासाचा कणा समजले जातात.

# 7 एप्रिल ला होणार लोणार येथे योग महोत्सव : केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव

प्रतिनिधी ६ एप्रिल



**बुलढाणा :** आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे ७५ दिवस बाकी असताना योगाचा प्रचार प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून आयुष मंत्रालयाच्या वतीने ७ एप्रिल ला योग महोत्सवाचे आयोजन लोणार येथे करण्यात आले आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी योग साधनेमध्ये नागरीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले आहे. योग साधना ही भारतीय संस्कृतीतील एक प्राचीन आणि महान परंपरा आहे, जी केवळ शारीरिक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांच्यातील सुसंवाद साधणारी एक जीवनशैली आहे. त्यामुळे जागतिक स्तरावरही योग साधनेचा स्वीकार केल्या जात आहे भारतीय योग साधनेला जागतिक स्तरावर पोचून भारतीय योग साधनेच्या माध्यमातून विश्वकल्याण व्हावे या दृष्टिकोनातून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांचे सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, चीन, फ्रान्स, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनिधी आहेत. यावर विस्तृत चर्चा होवून डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. २१ जून २०२६ ला १२ वा योग दिन साजरा केला जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आयुष मंत्रालयाच्या वतीने १०० दिवसाचे योग महोत्सव-२०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यातील पहिला कार्यक्रम दिल्ली येथे झाला. दुसरा ७५ दिवस बाकी असलेला काऊंट डाऊन योग महोत्सव कार्यक्रम ७ एप्रिल ला बुलढाणा जिल्हयातील जगप्रसिध्द लोणार सरोवर येथील छत्रपती शिवाजी महाराज उदयान येथे आयोजीत करण्यात आला आहे. या योग साधनेमध्ये ७ हजाराच्या अधिक योग साधक सहभागी होणार आहेत. या योग साधनेच्या माध्यमातुन ऐशियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्या जाणार आहे. एकाच वेळी त्रिकोणासन करणाऱ्या लोकांची सर्वाधीक संख्या राहणार आहे. अशी माहिती केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली या योग साधनेमध्ये इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनाईझेशन योग विद्या गुरुकूल क्रिडा भारती पतंजली योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हींग, लोणार येथील महिला बचत गट, शाळकरी विद्यार्थी आयुष संस्थेतील कर्मचारी सहभागी होणार आहेत. या पत्रकार परीषदेला मुरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान चे निदेशक डॉ.काशिनाथ समघंडी, कार्यक्रम अधिकारी डॉ.इश्वर आचार्य उपस्थित होते.

# खामगाव पालिकेच्या करवाढीला स्थगिती ; उपमुख्यमंत्र्यांकडे सुनावणी

प्रतिनिधी ६ एप्रिल

**नगरविकास विभागाचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्रः सुनावणीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याचा आदेश**



**खामगाव :** बहुचर्चित खामगाव नगरपालिकेच्या वाढीव करप्रश्नी अखेर नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार नगरविकास विभागाने करवाढीला तात्पुरती स्थगिती दिली असून, याप्रकरणी लवकरचसुनावणी होणार आहे, तसेच बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

खामगाव नगरपालिकेने मालमत्ता कर व पाणीकरात मोठ्या प्रमाणावर वाढ केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या वाढीव कराविरोधात व्यापारी, व्यावसायिक तसेच विविध सामाजिक संघटनांनी आक्षेप नोंदवत आंदोलनही केले होते. दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या प्रश्नावर स्थानिक व्यापारी, डॉक्टर, वकील, अभियंते, तसेच नागरी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली होती.खामगावातील बैठकीनंतर मंत्री जाधव यांनी ५ मार्च रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून करवाढ अन्यायकारक असल्याचे नमूद करत ती रद्द करण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रकरणाची दखल घेत करवाढीला स्थगिती देण्याचे व सुनावणी घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार नगर विकास विभागाने संबंधित आदेश जारी करून जिल्हाधिकाऱ्यांना स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. लवकरच याप्रकरणी उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात सुनावणी होणार आहे.खामगाव नगरपालिकेच्या वाढीव करवाढीला नगर विकास विभागाने स्थगिती देण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असून, पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, याप्रकरणी लवकरच नगर विकास विभागात सुनावणी होणार असून, त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. करवाढीच्या मुद्द्यावर निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ही सुनावणी महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे अंतिम निर्णय काय होणार, याबाबत खामगावकरांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

# तप्त झालेल्या जीवनाला अध्यात्माशिवाय तरणोपाय नाही – श्रीकृष्ण महाराज कुटे

प्रतिनिधी ६ एप्रिल




**मलकापूर :** तालुक्यातील भालेगांव रण येथे रामनवमी ते हनुमान जयंती पर्यंत संगीतमय श्रीमद् भागवत कथा व अंखड हरिनाम कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते. त्यात समारोपीय सांगते प्रसंगी काल्याच्या कीर्तनातून हभप श्रीकृष्ण महाराज कुटे यांनी तप्त झालेल्या जिवनाला खरी गरज कशाची असेल तर ती आध्यात्माची आहे, म्हणून तरुणांनी अध्यात्माची कास धरावी व जीवन समाधानी जगावे, असे प्रतिपादन केले.

सप्ताहामध्ये श्रीमद भागवत कथा प्रवक्ते हभप गजानन महाराज कोल्हे काकोडा हे होते. तर दररोज कीर्तन सेवा सर्वश्री हभप शिवचरित्रकार शिवाजी महाराज झांबरे बरफगांव, महंत नितीनदास महाराज मलकापूर, गुरुवर्य सारंगधर महाराज मेहूण, राहूल महाराज वाकेकर, नागेश महाराज आगलावे संग्रामपूर, पुंजाजी महाराज भालेगांव, श्रीकृष्ण महाराज वाघुड तसेच काल्याचे कीर्तन हभप श्रीकृष्ण महाराज कुटे भालेगांव यांनी केले. कीर्तनात व कथेत ह. भप संतोष महाराज म्हैसवाडी, हभप ज्ञानेश्वर महाराज महाळुंगी यांनी गायन केले. मृदंग हभप ओंकार महाराज जगधाळे लातूर, हभप अशोक अप्पा अकोटकर, तबला वादक हभप तुषार भोंबें, चेतन महाराज यांनी सेवा दिली.

या सप्ताहामध्ये भालेगाव, रणगांव, शिवणी हि. काझी जांबुळधाबा, देवधाबा येथील टाळकरी हजर होते.

# महिलेस मारहाण व विनयभंग

प्रतिनिधी ६ एप्रिल

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील देऊळगाव मही येथे एका महिलेच्या घरात मध्यरात्री घुसून मारहाण व विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेने दे. राजा पोस्टेला दिलेल्या तक्रारीवरून आरोपी प्रभाकर उत्तम खिल्लारे (रा. देऊळगाव मही) याच्याविरुद्ध कायम अप नं. १३३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७४, ३५१(२), ३५१(३) व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या राहत्या घरी घडली. फिर्यादी घरी झोपलेल्या असताना दरवाजावर आवाज आल्याने त्यांनी दरवाजा उघडला असता आरोपी दारात उभा होता. 'तू मला आधी आरोपीविरुध्द गुन्हा जेलमध्ये का टाकले?' असा जाब विचारत आरोपीने फिर्यादीला घराबाहेर ओढले व तिच्यावर वाईट उद्देशाने हात घालून विनयभंग केल्याचा आरोप आहे. यावेळी फिर्यादी व तिच्या मुलांनी आरडाओरडा केल्याने आरोपीने शिवीगाळ करत 'तुम्हाला पाहून घेतो' अशी धमकी देत घटनास्थळावरून पळ काढला. विशेष म्हणजे, या आधीही दोघांमध्ये शेतीच्या कारणावरून वाद असून आरोपीवर पूर्वीही गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. सदर प्रकरणी ३ एप्रिल रोजी दुपारी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस हवालदार नायबराव मोगल यांनी फिर्याद नोंदवली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कलीम देशमुख करीत आहेत.

# शेगावात 11 2 जणांचे स्वयंस्फूर्तीने रक्तदान

प्रतिनिधी ६ एप्रिल



**शेगाव :** येथील थॅलेसेमियाग्रस्त चिमुकली कु. निष्ठा पांडे हिला नियमित रक्तपुरवठा व्हावा, यासाठी शेगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन ५ एप्रिल रोजी राजेश्वर कॉलनी, येथे करण्यात आले होते. समाजातील विविध घटकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण ११२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या शिबिरात संकलित झालेले रक्त अकोला येथील साई ब्लड बँक यांना सुपूर्द करण्यात आले, कु. निष्ठा हिला आवश्यक असलेले बी-पॉझिटिव्ह रक्त वर्षभर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी साई ब्लड बँकेने स्वीकारली आहे, ज्यामुळे तिच्या उपचारांना मोठा आधार मिळाला आहे. शिबिराचे उद्घाटन शेगाव नगर परिषदेचे नगराध्यक्ष प्रकाश शेगोकार यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी आयोजक म्हणून सुरज मार्तडराव बोरसे, विपीन पाटील, तुषार कड, शिवाजी बाजारे, शैलेश साबळे, अंकुश खराटे, अतुल पाटील, विशाल काळे, श्रेयस महल्ले, वेदांत काळे, भारत पांडे आणि राहुल पांडे यांनी परिश्रम घेऊन शिबीर पार पाडले.या उपक्रमात केवळ आयोजकच नव्हे, तर अनेक नागरिकांनी कुटुंबासह सहभाग घेतला. राजकुमार खराटे यांनी पत्नी व दोन्ही मुलांसह रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. तसेच सचिन कोष्टी यांनी पत्नीसमवेत सहभाग नोंदवला. शेगाव शहराचे उपपोलीस निरीक्षक कुणाल जाधव, सदगुरु कन्स्ट्रक्शनचे राजेश ढेंगे, गणेश उन्हाळे, मुकेश माळोकार, मयुर देशमुख, सारंग वाघमोडे, सुनिल तितुर आणि उमेश चंदनकार, भगवान कोकदे, अभिजीत गावंडे, शुभम दाणे, मुरलीधर टिकार, विठ्ठल तायडे, पांडुरंग उमाळे, सुषमा खराटे, अंकित राजनकर, विशाल खराटे, अभिषेक तळोकार, मोहन उमाळे, सुनील शिंगोलकर, अमोल घंगाळे, प्रफुल भातुलकर, सिद्धेश तांबेकर हिमांशू विजय कराळे, ऋषिकेश रमेश पायघन, यांच्यासह ११२ रक्तदात्यांनी रक्तदान करून या कार्याला हातभार लावला. यावेळी नगरसेवक अंबादास इंगळे, प्रल्हाद पांडे आणि संतोष पांडे यांचीही उपस्थिती लाभली

# देऊळगाव मही येथील २५ वर्षीय युवक बेपत्ता

प्रतिनिधी ६ एप्रिल

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील देऊळगाव मही येथील २५ वर्षीय युवक अचानक बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण बाबुराव शिंगणे (वय ६०, रा. देऊळगाव मही) यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्यांचा मुलगा संतोष लक्ष्मण शिंगणे (वय २५) हा ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेला असून अद्याप परतलेला नाही. सदर प्रकरणी त्याच दिवशी सायंकाळी ५:१३ वाजता कायम मिसिंगनं. १०/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा तपास पोलीस हवालदार विश्वनाथ काकड यांनी नोंदवून पुढील तपास पोलीस हवालदार कलीम देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. बेपत्ता युवकाची उंची सुमारे ५ फूट ५ इंच, रंग सावळा, बांधा सडपातळ. अंगात पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट, निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, पायात चप्पल व गळ्यात तुळशीची माळ अशी वेशभूषा असून अशा वर्णनाचा युवक आढळल्यास संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# महसूल विभागाच्या सक्षमीकरणासाठी सुधारित आकृतीबंध मंजूर ; जिल्ह्यात नवीन कार्यालयांची निर्मिती

प्रतिनिधी ६ एप्रिल

बुलढाणा: राज्यातील महसूल प्रशासनातील कामाचा वाढता व्याप आणि नागरिकांची सोय विचारात घेऊन महसूल व वन विभागाने २ एप्रिल २०२६ रोजी विभागाचा नवीन सुधारित आकृतीबंध मंजूर केला आहे. या निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यासाठी नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि तीन नवीन अपर तहसीलदार कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा, मेहकर तालुक्यातील डोनगाव आणि खामगाव तालुक्यातील लखनवाडा येथे ही नवीन अपर तहसीलदार कार्यालये (लहान गट) कार्यान्वित होणार आहेत.

या ऐतिहासिक निर्णयामुळे महसूल विभागातील मंजूर पदांचा सर्वंकष आढावा घेऊन एकूण ३४,५७६ नियमित आणि १,३०० बाह्यस्त्रोतामार्फत भरावयाच्या पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्याची गणना 'मोठ्या जिल्ह्यांच्या' श्रेणीत करण्यात आली असून, अशा जिल्ह्यांसाठी नियमित १५१ पदे आणि बाह्ययंत्रणेमार्फत ११ पदे मंजूर करण्यात आली आहेत. नवीन निर्माण होणाऱ्या अपर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी १३ नियमित पदे, तर नवीन लहान अपर तहसीलदार कार्यालयांसाठी प्रत्येकी ७ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. नवीन कार्यालयांचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्र निश्चित करताना लोकसंख्या, तालुक्यांची संख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ या निकषांचा विचार केला जाणार आहे. अपर तहसीलदार कार्यालयाचे कार्यक्षेत्र निश्चित करताना 'मंडळ' हा घटक महत्त्वाचा मानला असून, कोणत्याही एका मंडळाचे विभाजन दोन कार्यालयांत होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. या नवीन रचनेमुळे महसूल प्रशासनाच्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून कामकाज अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. नवीन कार्यालयांच्या निर्मितीमुळे जिल्ह्यातील नागरिकांना जमिनीचे दाखले, महसुली प्रकरणे आणि इतर शासकीय सेवांसाठी आता स्थानिक पातळीवरच सोय उपलब्ध होणार असून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे.

# शिव महापुराण कथा व हरिनाम सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी ६ एप्रिल

**खामगाव :** बेलाड येथे ग्रामशांती, लोकार्पण सोहळा व शिवमंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने सुरू झालेल्या सप्ताहाचे द्वितीय वर्षानिमित्त ७ ल ते १४ एप्रिलपर्यंत बेलेश्वर शिव मंदिर बेलाड नवीन वै. गुरुवर्य येथे ह. भ. प. श्रीराम महाराज मेहुणकर यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त ह. भ. प. जगदेव महाराज बेलाड यांचे मार्गदर्शनात शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कथा प्रवक्ते ह. भ. प. मंगेश महाराज वराडेहे राहणार आहेत. यामध्ये दररोज सकाळी ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ९ ते १ शिवमहापुराण कथा, १ ते ३ प्रसाद, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, दररोज रात्री ८.३० ते १०.३० ह. भ. प. गोविंद महाराज गोरे आळंदी देवाची, पांडुरंग महाराज गिरी वावीकर,अनिल महाराज पाटील बार्शीकर, ज्ञानेश्वर महाराज जळकेकर जळगाव खान्देश, पुरुषोत्तम महाराज पाटील बुलढाणा, संजय महाराज पाचपोर, गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपुरकर तसेच १४ एप्रिल रोजी गुरुवर्य ह. भ. प. भास्करगिरी महाराज श्रीक्षेत्र देवगड यांचे काल्याचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. १३ एप्रिल रोजी गावाच्या सर्व प्रमुख मार्गावरून दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १४ एप्रिल रोजी महाप्रसादाने सदर कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# ३ ३ ५ स्प्रिंकलर तोट्या, मोटारपंप व केबल लंपास

प्रतिनिधी ६ एप्रिल

**लोणार:** तालुक्यातील हिरडव, दाभा व जाफ्राबाद या तिन्ही शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतातील ३३५ स्पिंकलरच्या तोट्या, विद्युत मोटर पंप, केबल असे साहित्य लंपास केले असून एकूण ९० हजार ७५० रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

या शिवारात १८ ते २० शेतकऱ्यांनी आपल्या शेतात उन्हाळी भुईमंग व मुंग पेरलेला आहे आणि या सर्व शेतकऱ्यांनी ३ एप्रिल रोजी शुक्रवारला संध्याकाळी ७ ते ७:३० वाजता आपल्या शेतात स्पिंकलर चालू करून दिले. व वातावरण खराब असल्यामुळे सर्वजण पाहणी करून घराकडे निघून आले. चोरट्याने हीच संधी साधून स्प्रिंकलर तोट्या ३३५नग ५ मोटर पंप व ३०० फूट केबल चोरट्यांनी लंपास केले. असून ४ फेब्रुवारी रोज शनिवारला जाफ्राबाद येथील पोलीस पाटिल रमेश तान्हाजी ओव्हर हे आपल्या शेतात रोज नेहमीप्रमाणे सकाळी पाहणी करण्याकरता गेले असता. स्पिंकलर तोट्या दिसून आल्या नाही. त्यांनी सर्व शेजारी असलेल्या शेतकऱ्यांना मोबाईल व्दारे माहिती दिली असता त्यांच्या शेतातील तोट्या गेल्याचे निदर्शनास आले. त्यापैकी रमेश तानाजी ओव्हर, पांडुरंग ओव्हर भानुदास राजगुरू, राम राजगुरू, विश्वास ओव्हर, कडूजी मोरे नाही, अरुण ओव्हर, वैभव ओव्हर, पांडुरंग मोरे, प्रकाश मोरे, ओम मोरे, विजय घायाळ, रमेश मोरे, संजय घायाळ, विठ्ठल केशव मोरे, अंकुश ओव्हर, दशरथ पुरी, ज्ञानेश्वर तपासे या सर्व शेतकऱ्यांच्या मिळून ३३५ नग स्पिंकलरच्या तोट्या व पांडुरंग मोरे यांची टेक्समो कंपनीची ५ एचपी. ची समर्सिबल मोटर पंप व ३०० फूट केबल असे एकूण ९० हजार ७५० रुपयाचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. या अगोदरही शेतकऱ्यांचे साहित्य चोरीला गेले असून. लोणार पोलीस स्टेशनला अनेक वेळा तक्रार देऊनही. चोरांचा शोध लागलाच नाही. याबाबत लोणार पोलिस स्टेशनला रमेश तानाजी ओव्हर यांनी तक्रार दिली असून अज्ञात आरोपी विरुध्द भारतीय न्यायसंहिता २०२३,२०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# जय मल्हार नवयुवक मंडळाचा नंगर सोहळा

प्रतिनिधी ६ एप्रिल





**♦ सामाजिक ऐक्याचे प्रतीक : दिलीपकुमार सानंदा**

**खामगाव :** आवार येथील जय मल्हार नवयुवक मंडळाच्या वतीने दरवर्षी खंडोबा रायाचा भव्य नंगर सोहळा आयोजित करण्यात येत असतो. या माध्यमातून बाहेरगावावरुन आलेली वाघे मंडळी जागरण गोंधळ,भजन-किर्तन यासारखे कार्यक्रम सादर करतात.ज्यामुळे धार्मिक आणि सांस्कृतीक वातावरण निर्माण होते.अश्या पारंपारीक उत्सवामुळे आपल्या संस्कृतीचे जतन होत असुन समाजात एकजुटीची भावना दृढ होते.गावातील सर्व नागरीक एकत्र येवुन या विधायक कार्यात सहभागी होतात. हा नंगर सोहळा सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले. दि.०४ एप्रिल २०२६ रोजी आवार येथील जय मल्हार नवयुवक मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे याहीवर्षीही नंगर सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खामगाव तालुकाअध्यक्ष मनोज वानखडे, खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सुभाष पेसोडे, बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे,जामुवंतराव देशमुख, नागापुरचे सरपंच कैलास वासनकार,विठठ्ल धानोरे,वैभव धानोरे,हरि पेसोडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी श्री खंडोबा रायाचे व नंगरचे पुजन करुन दर्शन घेतले. यावेळी जय मल्हार नवयुवक मंडळाच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा शेला,टोपी देवुन सत्कार करण्यात आला.यावेळी जय मल्हार नवयुवक मंडळाचे अध्यक्ष मारोती बोंद्रे,गणेश खऱ्हाटे, ज्ञानदेव वैतकार,विष्णु महाराज गाडगे,संतोष साबे, विनोद खराटे,संतोष लोणाग्रे,विश्वनाथ वैतकार,गणेश साबे, रघुनाथ मुयांडे, योगेश खराटे,मनोहर लोणाग्रे,राजेश वैतकार,गोपाल खराटे, वैभव वैतकार,विशाल वैतकार,सागर मुयांडे,गोवर्धन भिसे यांच्यासह जय मल्हार मंडळाचे पदाधिकारी,कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. नंगर सोहळयानिमित्त ४ एप्रिल रोजी वाघेमंडळींचे रात्रभर जागरण गोंधळ होवुन दि.०५ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता देवाचे लग्न लावुन हजारो भाविकांच्या उपस्थितीत ज्ञानेश्वरआप्पा मिटकरी व सहकाऱ्यांच्या हस्ते नंगर तोडण्यात आला.तद्नंतर गावातून भंडारा उधळत खंडोबारायाची मिरवणूक काढण्यात आली.भव्य नंगर सोहळा महोत्सवानिमित्त रविवारी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पंचक्रोशीतील हजारो भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. नंगर सोहळयाच्या यशस्वीतेसाठी जय मल्हार नवयुवक मंडळ आवार व आवार येथील समस्त गावकरी मंडळींनी परिश्रम घेतले. येळकोट-येळकोट जय मल्हारच्या घोषणेने आवार गाव दणाणून गेले होते.






भारतीय जनता पक्षा चा ४७ वा स्थापना दिन सोमवार, ६ एप्रिल रोजी जिल्हा भाजप कार्यालयात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत पक्ष ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांनी ध्वजाला मानवंदना दिली. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, महापौर शारदाताई खेडकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, कृष्णा शर्मा, नगर सेवक नितीन ताकवाले, वैशाली शेळके, मंजुषा शेळके, चंदा शर्मा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 2 हजार 56 जागांसाठी आले 5 हजार 598 प्रवेश अर्ज !

**जिल्ह्यात आरटीई प्रवेशासाठी चुरस; आज निघणार सोडत**

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** आरटीईअंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत शासनाने अंतराच्या निकषात शिथिलता आणल्याने पालकांना मोठा दिलासा मिळाला असून, अर्जाची संख्या लक्षणीय वाढली आहे. प्रारंभी लागू असलेल्या एक किलोमीटर अंतराच्या मर्यादेमुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ज करता आले नव्हते; मात्र मुदतवाढीनंतर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाले असून, एकूण अर्जाची संख्या ५ हजार ५९८ वर पोहोचल्याने प्रवेशासाठी मोठी चुरस निर्माण होणार आहेरु त्यासाठी ६ एप्रिलला पुणे येथे सोडत काढण्यात येणार असून, त्याचे ऑनलाइन प्रक्षेपण जिल्हा स्तरावरही होणार आहे. त्यामुळे बालकांच्या प्रवेशाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

जिल्ह्यात आरटीईअंतर्गत २ हजार ५६ जागा उपलब्ध आहेत. प्राप्त अर्जाच्या तुलनेत प्रत्येक जागेसाठी सरासरी २ ते ३ विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे.

त्यामुळे यंदा प्रवेशासाठी चुरस वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, अर्जाची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रवेशासाठीची सोडत (लॉटरी) ६ एप्रिल २०२६ रोजी काढण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेत आयुक्त (शिक्षण) यांच्या हस्ते ही प्रक्रिया पार पडणार असून, तिचे थेट प्रक्षेपण ऑनलाइन माध्यमातून उपलब्ध करून दिले जाणार आहे. लॉटरीचा निकाल पालकांना एसएमएसद्वारे कळविण्यात येणार आहे.आरटीई प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ होती.

या कालावधीत ५ हजार ५९८ पालकांनी आपल्या पाल्यांची नोंदणी पूर्ण केली. सुरुवातीला लागू असलेल्या अंतराच्या अटीमुळे अनेकांना अर्ज करता आला नव्हता; मात्र ही अट शिथिल होताच अर्जाची संख्या झपाट्याने वाढली. विशेषत: शहरी भागातील पालकांना याचा अधिक लाभ झाला आहे.आरटीई लॉटरीनंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग येणार आहे.




**पालकांनी कागदपत्रे तयार ठेवावी!**

◆लॉटरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी संबंधित शाळेत निर्धारित कालावधीत जाऊन प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी जन्मदाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी पुरावा आदी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

**◆ उपचारांचा लाभ झाल्याचा रूग्णांचा दावा**

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.




माझे नांव विद्या, नाईक होमिओपॅथी येथे येण्यापुर्वी मला लठ्ठपणाचा त्रास होता, माझे गुडघे दुखायचे, शरीर भारी झाले होते. चालतांना त्रास व्हायचा, उठतांना त्रास व्हायचा, नाईक होमिओपॅथी येथे २ महिने उपचार घेतला. यादरम्यान माझे ५ किलो वजन कमी झाले. शरीर आता हलके वाटायला लागले आहे. नाईक होमिओपॅथीच्या उपचाराने मी ६० टक्के समाधानी आहे.

# कॅप्टन आशिष दामले बुधवारी अकोला जिल्ह्यात

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले ७ व ८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता मूर्तिजापूर येथे पोहोचतील. शासकीय विश्रामगृह मूर्तिजापूर येथे आगमनानंतर सर्व शाखीय ब्राम्हण सभा, मूर्तिजापूर यांच्या वतीने आयोजित उद्योजक व्यवसाय मार्गदर्शन मेळावा व सत्कार समारंभ कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सालासर रिसॉर्ट, कंझरा रोड, मूर्तिजापूर येथे होणार आहे. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता पळसो बढे, ता. मूर्तिजापूर येथे असलेल्या सद्गुरु रामगोपाल महाराज तिर्थक्षेत्र संजीवन समाधी येथे दर्शन घेणार आहेत.

# बियॉन्ड जिमचे पालकमंत्री व आमदारांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** व्यायाम आणि जिम हा फिटनेस मिळवण्याचा एक उत्तम मार्ग आहे. शहरातील तरुण, महिला आणि पुरुषांसाठी जागतिक दर्जाची उपकरणे आणि सर्व सुविधांनी सज्ज अशा 'बियॉन्ड फिटनेस सेंटरची निर्मिती शहरातील अशोक वाटिका समोरील गणपती प्लाझा येथे करण्यात आली आहे. शहरातील प्रतिष्ठित बाछुका परिवाराच्या या नवीन उपक्रमाचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर आणि लोकप्रिय आमदार रणधीरभाऊ सावरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

**आधुनिक सुविधांनी सज्ज फिटनेस सेंटर**

३१ मार्च रोजी या आधुनिक फिटनेस सेंटरचे शानदार उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महापौर शारदाताई खेडकर, स्थायी समिती सभापती विजयभाऊ अग्रवाल आणि अकोला भाजपचे शहर प्रमुख जयंत मसने प्रामुख्याने उपस्थित होते. वसंत बाछुका परिवारातर्फे सर्व मान्यवर पाहुण्यांचे स्वागत शाल आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. बियॉन्ड फिटनेस सेंटरमधील वैशिष्ट्यात संपूर्ण एअर कंडिशन्ड परिसर, जिम, कार्डिओ आणि स्ट्रेंथ ट्रेनिंगची आधुनिक उपकरणे, स्टीम बाथ, क्रॉस फिट, योगा आणि झुम्बा, प्रमाणित ट्रेनर्सचा समावेश आहे. आरोग्याप्रती जागरूक लोकांसाठी उत्तम वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. उद्घाटनानंतर सर्व पाहुण्यांनी जिमची पाहणी केली आणि तिथल्या जागतिक दर्जाच्या मशिनरी पाहून त्यांचे कौतुक केले. काही अतिथींना तर व्यायामाच्या उपकरणांवर स्वतः हात आजमावण्याचा मोह आवरला नाही.

**◆ अशोक वाटिका समोर गणपती प्लाझा मध्ये थाटले जिम**



पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी आवाहन केले की, 'बाछुका परिवाराने अकोलेकरांसाठी फिटनेसचा एक उत्तम पर्याय उपलब्ध करून दिला आहे, ज्याचा लाभ सर्वांनी घ्यावा.' 'बियॉन्ड फिटनेसमध्ये केवळ व्यायामावरच नाही, तर स्ट्रेस मॅनेजमेंट वर विशेष लक्ष दिले जाईल. कारण तणावामुळे अनेक आजार उद्भवतात, म्हणूनच आम्ही याचे नाव 'बियॉन्ड फिटनेस' ठेवले आहे.' अशी माहिती बाछुका परिवाराने दिली. या सोहळ्याला उपमहापौर अमोल गोगे, नगरसेविका कल्पना गोटफोडे, संजय गोटफोडे, संतोष डोंगरे, देवाशिष काकड, प्रकाश घोगलिया, सौ. निकिता राहुल देशमुख, कृष्णा शर्मा, अनुप शर्मा, रणजित खेडकर, अजय शर्मा, गिरीश गोखले यांसह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशमुख महिला मंडळाची मासिक सभा थाटात संपन्न



प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** देशमुख महिला मंडळाची मार्च महिन्याची मासिक सभा हॉटेल सेंटर प्लाझा येथे झाली. मंगलगीरी ग्रुपच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.

सभेची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने करण्यात आली. पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले यावेळी मंचावर उपस्थित महापौर सौ. शारदाताई खेडकर, नवनिर्वाचित नगरसेवक ,गटनेता पवन महल्ले, लिनेस क्लब अकोलाच्या प्रांताध्यक्षा सौ. कल्पनाताई देशमुख आदींचा मंडळाकडून शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊन मंडळाच्या अध्यक्षा राजश्री ताई,ज्येष्ठ सल्लागार कविताताई, कोषाध्यक्षा प्रतिभाताई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ.शीलाताईचे स्वागत साधनाताईनी केले. अनुराधा, मनीषा, नीता यांनी मंचावर उपस्थित असलेल्या कार्यकारिणीचे व गृप लीडर राखी महल्ले यांचे स्वागत केले. मंडळात २५२ सदस्य आहे त्यांचे १२ ग्रुप करण्यात आले. प्रत्येक ग्रुपला यावेळी साड्यांची नावे देण्यात आली. या महिन्यात पाणपोई लावण्याचा उपक्रम घेतला त्याची माहिती सौ. वैशाली हेमंत यांनी दिली.

आपली संस्कृती जपत सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात गुढी व श्रीराम -सीता मातेच्या आगमनाने झाली. कार्यक्रमाचे बहारदार सुत्र संचालन सुजाताताई यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सौ. सुचिताने दिला तर आभारप्रदर्शन वैशाली यांनी केले. राखी, प्रियंका,अनुजा, मनिषा, सुचिता,साधना,सविता यांनी होळी रामनवमी या गाण्यावर अप्रतिम नृत्य केले. सपना नी उत्कृष्ठ सोलो डान्स केला तर रुपाली व नीता यांनी खुप सुंदर नृत्य केले. ग्रुपच्या वतीने हौजी गेम घेण्यात आला. त्यामध्ये शिल्पा पंकज , सिद्धी, पुजा , अश्विनी, रेवती पावडे, संजीवनी, ममता, ज्योती ताई,सुशीला, वर्षा, विद्या, पौर्णिमा, वसुधा, उज्वला, वैशाली, मंजू, प्रियंका, उषा ताई, प्रतिभा, सीमा, सुनीता, संजीवनीताई ह्या विनर ठरल्या. आणि चिठ्ठी गेम मध्ये मनिषा,कल्पना, वैशाली, श्वेता, कांचन, अल्का, सीमा, लता यांनी बक्षीस पटकावले. ड्रेस कोडचे बक्षीस मेघा काळे,सीमा, रुशाली यांनी पटकावले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मांगलगिरी ग्रुप च्या सदस्या प्रतिभा, वैशाली, सपना, मोहिनी, अनुजा, मनिषा, कोमल, नीता, वैशाली मोहड, प्रियंका, अनुराधा, सुचिता, किरण, श्रद्धा, आशा, साधना,सविता,अर्चना, सुजाताताई, आणि ग्रुप लीडर राखी यांनी अथक परिश्रम केलेत. आणि अशा प्रकारे मार्च महिन्यात महिन्यातील देशमुख मंडळाची मासिक सभा अतिशय आनंदी व हर्षोल्लासत पार पडली.


# तेल्हाऱ्याच्या धोंडाआखर परिसरात बिबट्याचा वावर

**◆ रात्री रस्त्यावर बिबट्या दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण**

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** तेल्हारा तालुक्यातील धोंडाआखर परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी गावाजवळच रस्त्यावर बिबट्या बसलेला दिसल्याने नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. वन विभागाने तात्काळ उपाययोजना करून नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या धोंडाआखर या आदिवासी भागात वन्य प्राण्यांचा वावर अधूनमधून पाहायला मिळतो. मात्र, यावेळी बिबट्याने थेट गावाच्या हद्दीत प्रवेश केल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. धोंडाआखर येथील माजी सरपंच दिनेश मावसे हे रात्रीच्या सुमारास आपल्या शेतात पिकांना पाणी देण्यासाठी जात असताना, त्यांच्या घराजवळील डांबरी रस्त्यावर बिबट्या निवांतपणे बसलेला दिसला. अचानक समोर बिबट्या आल्याने ते क्षणभर घाबरले, मात्र त्यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ गावकऱ्यांना याची माहिती दिली.या घटनेनंतर गावात एकच खळबळ उडाली असून, अनेक नागरिकांनी रात्री बाहेर पडणे टाळले आहे. शेतकरी, मजूर तसेच विद्यार्थी यांच्यामध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना धोका निर्माण झाला असून, लहान मुलांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये चिंता वाढली आहे.दरम्यान, परिसरातील जंगल भाग जवळ असल्यामुळे बिबट्याचा वावर वाढल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अन्न व पाण्याच्या शोधात बिबट्या गावाकडे वळल्याचा अंदाज स्थानिकांकडून व्यक्त केला जात आहे. ग्रामस्थांनी वन विभागाने तात्काळ घटनास्थळी येऊन पाहणी करावी, पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे तसेच नागरिकांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करावे, अशी मागणी केली आहे.सध्या संपूर्ण परिसरात भीतीचे सावट असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे बनले आहे.



# हातात शस्त्र घेवून दहशत निर्माण करणाऱ्या इसमावर कारवाई



प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** रविवारी एक इसम हातात धारदार चाकू घेवुन वसंत देसाई स्टेडीयम समोरील पेट्रोलपंपच्या बाजूला अग्रसेन चौकाकडे जाणा-या रोडवर आरडा ओरड करून दहशत निर्माण करीत होता. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. दुर्गा चौकातील रोहीत अमरजीतसिंग रोहेल २५ वर्ष यास ताब्यात घेवून कलम ४, २५ आर्म ॲक्ट प्रमाणे कार्यवाही करण्यात आली. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेडडी व उप विभागीय पोलीस अधिकारी शहर विभाग यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक रामदासपेठ शिरीष खंडारे यांच्या नेतृत्वात अंमलदार अनिल भातखडे, सुरेश लांडे, संदीप वानखडे, रोशन पटले, इमाम चौधरी, अभिजीत इंगळे यांनी कारवाई केली.

# श्री श्याम संकीर्तन द्वितीय महोत्सवाची तयारी जोरात

**१० एप्रिल रोजी सिटी स्पोर्ट्स क्लबच्या भव्य प्रांगणात होईल विशाल आयोजन**

प्रतिनिधी ६ एप्रिल

**अकोला :** महानगरातील सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक सेवाकार्यात सक्रिय असलेल्या 'गोरक्षण रोड का राजा – विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळा'च्या वतीने द्वितीय श्री श्याम संकीर्तन महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात देशभरातील ख्यातनाम भजनकार आपल्या सादरीकरणातून भक्तिमय वातावरण निर्माण करणार आहेत.

या संदर्भात रामदेवबाबा–श्यामबाबा मंदिर येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. आयोजकांनी सांगितले की, हा महोत्सव १० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता मूर्तिजापूर रोडवरील सिटी स्पोर्ट्स क्लबच्या विशाल प्रांगणात पार पडणार आहे. मंडळाच्या वतीने गतवर्षी प्रथम श्याम संकीर्तन महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रसिद्ध भजनकार राज पारीक यांनी आपल्या सुमधुर भजनांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले होते. यावर्षी हा महोत्सव अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. राजस्थानचे सुप्रसिद्ध भजनकार छोटूसिंह रावणा हे 'तीन बाण के धारी' या भजनामुळे देशभर प्रसिद्ध असून, ते प्रथमच अकोल्यात सादरीकरण करणार आहेत. त्यांच्या श्यामभजनांमुळे भाविकांना विशेष आध्यात्मिक अनुभूती मिळणार आहे. त्यांच्यासोबत खाटू धामशी संबंधित सेवाधारी भजनकार महाराज श्यामसिंह चौहान यांचीही उपस्थिती राहणार आहे. तसेच इंदूरचे प्रसिद्ध बासरीवादक देव कनेरी आपल्या मधुर सुरांनी कार्यक्रम अधिक रंगतदार करतील. याशिवाय स्थानिक भजनकार गोपाल शर्मा हरे यांच्या 'गोरक्षण का राजा' या गीताच्या व्हिडिओ फिल्मचे अनावरणही यावेळी करण्यात येणार आहे. महोत्सवाच्या निमित्ताने आकर्षक व भव्य श्री श्यामबाबांचा दरबार सजविण्यात येणार असून, फुलांची सजावट व सुगंधित अत्तरांची उधळण करण्यात येईल. पत्रकार परिषदेत मार्गदर्शक सुधीर रांदड, संजय शर्मा, मुरलीधर उपाध्याय, एड. सौरभ शर्मा, राजू शर्मा बालाजी, प्रथमेश शर्मा, मधुर बिसेन, सिमरनजीत सिंह बघेर, पं. श्रीकांत इंडोरिया, मुकेश शर्मा, अनमोल बघेर, सुनील कोरडिया, अभिलाष गाडे, हिमांशु दोशी, यश बियाणी, समार्थ सोनौने, कृष्णा शर्मा, सम्यक शर्मा आदी उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK